

# भावपूर्ण श्रद्धांजली

**मा.आ.डॉ.पतंगरावजी कदम**
सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल,
रयत शिक्षण संस्था, सातारा



**मा.भाई.एस.एम.पाटील**
उपाध्यक्ष
रयत शिक्षण संस्था, सातारा

"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" - कर्मवीर
रयत शिक्षण संस्थेचे,

# सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज

ता.कराड, जि.सातारा - ४१५ १०९

# त्रिवेणी

सन २०१७ - २०१८



'त्रिवेणी' नियतकालिक । सन २०१६-२०१७



## संपादक समिती

- **अध्यक्ष :**
  प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे
- **प्रमुख संपादक :**
  प्रा.डॉ.तानाजी पाटील
- **विभागीय संपादक :**
  प्रा.डॉ.सुनील चंदनशिवे (मराठी)
  प्रा.डॉ.वंदना मोहिते (हिंदी)
  प्रा.मनोहर माळगे (इंग्रजी)
  प्रा.लालासाहेब पवार (सामाजिक शास्त्र)
  प्रा.कल्पना पाटील (अहवाल)
- **विशेष सहाय्य :**
  प्रा.आशा मडावी
  प्रा.मारुती तांबे
- **मुद्रक :**
  प्रिंट ओम ऑफसेट
- **अक्षर संधान :**
  टाईप इनोव्हेटर्स
- **मांडणी :**
  प्रा.डॉ.तानाजी पाटील
- **मुखपृष्ठ :**
  प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे

# प्रगतीच्या पाऊल खुणा

- ※ विद्यापीठापेक्षा महाविद्यालयाचे निकाल अधिक
- ※ विद्यार्थीनींच्या बौध्दिक व व्यक्तिमत्त्व विकासाचे अनेक उपक्रम
- ※ मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास व समाजशास्त्र इ.स्पेशल विषयांची सोय
- ※ विविध शॉर्ट टर्म कोर्सेस
- ※ अद्यावत संगणक प्रयोगशाळा
- ※ कर्मवीर विद्याप्रबोधिनी
- ※ स्पर्धा परीक्षा केंद्र
- ※ इंग्लिश स्पिकींग कोर्स
- ※ सुसज्ज महिला वसतिगृह
- ※ ज्युडो, कराटे प्रशिक्षण
- ※ ह्युमन राईटस् एज्युकेशन फाऊंडेशन कोर्स
- ※ फॅशन डिझाईनिंग कोर्स
- ※ ट्रॅव्हल्स् ॲण्ड टू रिझम कोर्स
- ※ कलादालनाद्वारे मुलींच्या सुप्त गुणांना वाव
- ※ भित्तीपत्रकाद्वारे विद्यार्थीनींच्या साहित्य गुणांना वाव
- ※ क्रीडा विभागामार्फत अनेक खेळांचे प्रशिक्षण



## त्रिवेणी


दि प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स नियमन फॉर्म ४ प्रमाणे आवश्यक माहिती –

प्रकाशन स्थळ :
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज

प्रकाशन काळ : वार्षिक

प्रकाशक : प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज ता.कराड, जि.सातारा ४१५ १०९.
दूरध्वनी : (०२१६४) २६४२३५
ई–मेल : yssmmuks@yahoo.co.in

संपादक : प्रा.डॉ.तानाजी पाटील
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,उंब्रज ता.कराड, जि.सातारा ४१५ १०९

मुद्रक : श्री.संदेश शहा
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : २६९ ब/२, दौलतनगर करंजे, सातारा ४१५००२
फोन : (०२१६२) २३४०४९

संगणक : श्री.संदेश शहा
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : १९५, सदाशिव पेठ, मोती चौक, सातारा ४१५००२
फोन : (०२१६२) २३४३७२

मालकी : रयत शिक्षण संस्थेचे,
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज ता.कराड, जि.सातारा

प्राचार्य : डॉ.कैलास जगदाळे


या अंकातील साहित्यातून व्यक्त झालेली मते सबंधित लेखकांची आहेत. संपादक मंडळ त्या मताशी सहमत असेलच असे नाही.



रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक

# पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील

(२२ सप्टेंबर १८८७ – ९ मे १९५९)

" दिव्य अलौकिक
तुमचे जीवन
स्मृतीस तुमच्या
शतशः वंदन :। "

रयत माऊली
## सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटी



''पूर्ती आकांक्षा अन् आशा गुणगुणती या दाही दिशा''



रयत शिक्षण संस्थेचे
## पदाधिकारी



मा.खासदार डॉ.शरदचंद्रजी पवारसाहेब
अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा.



मा.डॉ.अनिल पाटील
चेअरमन,रयत शिक्षण संस्था,सातारा.



मा.प्राचार्य डॉ.भाऊसाहेब कराळे
सचिव,रयत शिक्षण संस्था,सातारा



मा.प्राचार्य डॉ.विजयसिंह सावंत
सहसचिव,रयत शिक्षण संस्था,सातारा



मा.प्राचार्य अरुण आंधळे
ऑडिटर,रयत शिक्षण संस्था,सातारा




महाविद्यालयाचे कार्यकुशल संघटक | प्राचार्य, डॉ. कैलास जगदाळे

## • महाविद्यालय विकास समिती •


मा.द.श्री.जाधव (आबा)
स्थानिक प्रतिनिधी (उद्योजक)


मा.डॉ.रणजित जगताप
स्थानिक प्रतिनिधी (समाजसेवा)


मा.डॉ.प्राचार्य डॉ.के.जी.कानडे
स्थानिक प्रतिनिधी (शिक्षण)


डॉ.अभय पाटील
प्राचार्य नियुक्त


प्रा.मनोहर माळी
समन्वयक, आय.क्यू.ए.सी.


प्रा.आशा मद्भावी
प्राध्यापक प्रतिनिधी


प्रा.कल्पना पाटील
प्राध्यापक प्रतिनिधी


श्री.भरत पवार
शिक्षकेतर सेवक प्रतिनिधी


श्रीमती विद्या भोसले
स्थानिक प्रतिनिधी (संशोधन)


कु.नम्रता काटवटे
विद्यार्थिनी प्रतिनिधी

# अध्यक्षीय मनोगत...



सन्मित्र हो,

'त्रिवेणी' २०१७-२०१८ हा वार्षिक नियतकालिक प्रकाशित करताना मला निश्चित अभिमान वाटतो. महाविद्यालयाचा हा पाचवा अंक आपल्यापुढे ठेवताना मनस्वी आनंद होत आहे.

याचे सर्व श्रेय माझ्या विद्यार्थीनीना, संपादक मंडळ, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक वर्ग आणि महाविद्यालय विकास समितीचे सदस्य व उंब्रज पंचक्रोशीतील सर्व शिक्षणप्रेमींना आहे. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थीनींच्या सृजनशीलतेविषयी कौतुक आहेच; पण संपादकीय मंडळींची स्वीकृत कार्यात झोकून देण्याची वृत्ती, सुजाण अभिरुची कलात्मकताही शब्दांतीत आहे. याचा प्रत्यय आपणास पानोपानी येईल.

विद्यार्थीनींच्या व्यक्तिमत्त्वातल्या बलस्थानांची जाणीव, कर्तव्यबुध्दी, राष्ट्रियत्वाची भावना, विवेकवादी विचारांची रुजवण, बंधुभाव वृध्दी, सामाजिक जाणीव, सलोखा, मानवतावादी दृष्टिकोन, पर्यावरणविषयक जाणीव, विज्ञानवादीवृत्ती, स्त्री-पुरुष समानतेचा विचार आणि करिअरसंबंधी जागरुकता इत्यादींसाठी आम्ही जाणीवपूर्वक उपक्रम राबवतो. तसेच 'योगा' व भारत सरकारचा 'हाऊस किपिंग कोर्स' जून २०१८ पासून चालू केलेला आहे. लेडीज होस्टेल पूर्ण झाले असून वाणिज्य शाखा येत्या जून २०१८ पासून चालू करण्याचा मानस आहे.

'स्पर्धा परीक्षा', 'वाङ्मय मंडळ', 'भित्तीपत्रकं', 'शॉर्टटर्म कोर्सेस', 'टी.सी.एस.', 'काव्यलेखन स्पर्धा' आणि 'अग्रणी महाविद्यालयां'तर्गत विविध व्याख्याने, 'स्टाफ वेल्फेअर', 'तक्रार निवारण समिती' आणि 'कमवा व शिका योजना' आणि 'करिअर मार्गदर्शन' समितीच्यावतीने तज्ञ मार्गदर्शकांची व्याख्याने, ह्यूमन राईटस् कार्यक्रमाप्रसंगी विविध व्याख्याने आयोजित केली जातात.

महाविद्यालयाच्या प्रगतीचा व विविध उपक्रमांचा प्रभाव उंब्रज व उंब्रज परिसरात निश्चित झाला आहे. त्यामुळे विद्यार्थीनींच्या संख्येत वाढ झालेली आहे. महाविद्यालयातील अभ्यासू, उपक्रमशील व संशोधन मग्न प्राध्यापक वर्ग आमच्या महाविद्यालयाचे प्रेरणा स्थान आहे. खास करुन ग्रामीण भागातील विद्यार्थीनींसाठी ज्युडो कराटे, बॉक्सिंग यासारखे कोर्स चालू करुन विद्यार्थीनींच्या व्यक्तिमत्त्व विकासाला खऱ्या अर्थाने चालना दिली आहे.

क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच काव्यवाचन, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि एन.एस.एस. या सर्वामध्ये विद्यार्थीनींनी चांगले यश मिळविले आहे. विद्यार्थीनींना स्वत:च्या पायावर उभे राहता येईल असे अल्प मुदतीचे व्यवसायपूरक कोर्सेस दिले आहेत. वरील सर्व प्रकारच्या सेवा विद्यापीठ अनुदान आयोग, शिवाजी विद्यापीठ, रयत शिक्षण संस्था व खेड्या-पाड्यातील असंख्य पालक वर्ग, विद्यार्थीनी व प्राध्यापक वर्ग या सर्वांच्या प्रेरणा, मार्गदर्शन व सहकार्याने देत असताना मला मनस्वी आनंद होत आहे.

- प्राचार्य डॉ. कैलास जगदाळे



मराठी



त्रिवेणी



# अंतरंग

**गद्य विभाग**


| | | |
|---|---|---|
| १) शिक्षणक्रांतीचे जनक : महात्मा जोतिबा फुले | कु.प्रियंका काटवटे | बी.ए.भाग-३ |
| २) पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील जीवन व कार्य | कु.कांचन पाटणकर | बी.ए.भाग-३ |
| ३) काही विचार, काही अपेक्षा | कु.नम्रता नारायण काटवटे | बी.ए.भाग-३ |
| ४) [illegible] | कु.प्रियांका चंद्रकांत बाबर | बी.ए.भाग-१ |
| ५) सुखी जीवनाचा ठेवा, अनुभवातून [illegible] | कु.विद्या विजय मोळे | बी.ए.भाग-१ |
| ६) [illegible] | कु.पुजा विठ्ठल चंदुगडे | बी.ए.भाग-२ |
| ७) [illegible] | कु.शिवानी आबासो ठाकर | बी.ए.भाग-२ |


**पद्य विभाग**


| | | |
|---|---|---|
| १) फुलांनी पुन्हा हसावे | कु.प्रणाली मदन जाधव | बी.ए.-भाग१ |
| २) होळी व धुलिवंदन संदेश | कु.शिवानी आबासो ठाकर | बी.ए.-भाग२ |
| ३) जात | कु.स्नेहल राजेंद्र माने | बी.ए.-भाग१ |
| ४) मैत्रीण | कु.दिव्या विजय देशमुख | बी.ए.-भाग१ |
| ५) समाज | कु.निता सकपाळ | बी.ए.-भाग२ |
| ६) कॉलेजमधील जीवन | कु.मोनिका संभाजी जाधव | बी.ए.-भाग३ |
| ७) आनंद | कु.निता गणेश सकपाळ | बी.ए.-भाग२ |
| ८) माझी आई | कु.प्रणाली मदन जाधव | बी.ए.-भाग१ |
| ९) कोण पाहिजे ? | कु.स्नेहल राजेंद्र माने | बी.ए.-भाग१ |
| १०) [illegible] | कु.अनुजा जोशी | बी.ए.-भाग१ |
| ११) [illegible] | कु.अनुजा हणमंत जोशी | बी.ए.-भाग१ |
| १२) स्त्री भ्रूणहत्या थांबवा : लेक वाचवा | कु.संगीता ओमप्रकाश जॉंगीड | बी.ए.-भाग१ |




व्यक्तिचित्रण

# शिक्षणक्रांतीचे जनक : महात्मा जोतिबा फुले

कु.प्रियंका काटवटे, बी.ए.भाग-३

पददलीत समाजाचा उद्धार हेच महात्मा फुले यांनी आपले जीवित कार्य मानले होते. त्या समाजामध्ये शिक्षणाचे बीजारोपण करून त्याला प्रेरणा व चालना देण्याची महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या शिक्षणविषयक विचारामध्ये उपेक्षितांच्या शिक्षणाचा विचार अग्रक्रमाने दिसून येतो.

आधुनिक भारताचे पहिले सत्यशोधक, सामाजिक क्रांतीचे जनक म. जोतिबा फुले हे एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या माजसुधारकांच्या पिढीतील श्रेष्ठ समाजसुधारक होत. थॉमस पेन या विचारवंताच्या 'मानवाचे हक्क' [Rights of man] या ग्रंथाचा जोतिबावर फार मोठा प्रभाव होता. त्यामुळे समतेच्या पायावर आधारित शोषणरहित समाजरचना निर्माण करण्यासाठी त्यांनी अखंड कार्य केले. जोतिबांनी पददलितांची सुख-दु:खे आपली मानली. शेतकरी, कामकऱ्याच्या दु:खाला वाचा फोडली. शेतीला पाणी व मुलांना शिक्षण द्या असा आग्रह धरीत त्यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणाचा पाया घातला. स्त्रियांच्या उद्धारासाठी स्त्री शिक्षणाचा प्रारंभ करणारे ते पहिले भारतीय होत. त्यांनी सामाजिक कार्यासाठी व तत्त्वज्ञानाच्या प्रसारासाठी स्थापना केलेली सत्यशोधक चळवळ हीच भारतातील खेड्यापाड्यापर्यंत पोहोचलेली पहिली चळवळ होय. शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन मानून त्याद्वारे वरिष्ठ वर्गाच्या आर्थिक व सामाजिक गुलामगिरीतून बहुजन समाजाला मुक्त करण्याची मोलाची कामगिरी त्यांनी केली.

**शिक्षणाला अग्रक्रम :**

जोतिबांच्या कार्याची सामाजिक व शैक्षणिक अशी दोन अंगे आहेत. कारण सामाजिक कार्याला शिक्षणाची जोड दिल्याशिवाय सामाजिक क्रांती व समतेच्या तत्त्वावर आधारित आधुनिक समाजाची निर्मिती होऊ शकणार नाही याची त्यांना जाणीव होती. शिक्षणाच्या अभावामुळे होणाऱ्या अनर्थाकडे समाजाचे लक्ष वेधताना ते सांगतात,

"विद्येविना मती गेली; मतीविना नीती गेली,
नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले,
वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले."

म्हणूनच जोतिबांनी समाजपरिवर्तनासाठी शिक्षणाला अग्रक्रम दिला. शिक्षणातून प्राप्त होणाऱ्या बुद्धीवादी दृष्टिकोनामुळे दीनदलितांना आपल्यावरील अन्यायाची जाणिव होईल असा त्यांचा विश्वास होता. दीनदलित व बहुजन समाज यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यासाठी तत्कालीन सामाजिक परिस्थिती जशी कारणीभूत होती, तसेच इंग्रज सरकार धोरणही जबाबदार होते. या धोरणाला विरोध करून बहुजन समाजाच्या शिक्षणाचा प्रारंभ केला.

**स्त्री शिक्षण :**



तत्कालीन भारतीय समाजात स्त्री पशुवत जीवन जगत होती. ती रूढीच्या गुलामगिरीत खितपत पडली होती. जोतिबांनी स्त्री स्वातंत्र्याचा व शिक्षणाचा समर्थपणे पुरस्कार केला. एक स्त्री शिकली, एका कुटूंबाला शिक्षण दिल्यासारखे आहे. अशी त्यांची धारणा होती. स्त्रियांना शिक्षण दिल्याने समाजाचाच फायदा होणार आहे. या विचाराने सनातनी धर्म मार्तंडांचा विरोध

# संपादकीय



प्रिय वाचक

'त्रिवेणी' नियतकालिकाचा पाचवा अंक आपल्या हातामध्ये देत असताना मला अतिशय आनंद होत आहे. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या कार्यक्षेत्रातील सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालयाची ओळख वेगळी आहे. ग्रामीण भागाची ओळख असणाऱ्या या महाविद्यालयातील विद्यार्थीनींच्या अंगी संस्कृती भिनली पाहिजे; म्हणून आमचा सदैव प्रयत्न असतो. विद्यार्थीनींच्या कला, गुणांना अधिक वाव मिळावा तसेच त्यांची लेखन कला वृध्दींगत व्हावी यासाठी 'भित्तीपत्रक', 'अंकुर' या माध्यमातून आम्ही त्यांना प्रेरणा देत असतो.

'त्रिवेणी'च्या अंतरंगात मराठी, हिंदी, इंग्रजी आणि सामाजिक शास्त्रे या चार विभागाच्या सहकार्याने 'अंकुर'च्या माध्यमातून विद्यार्थीनींच्या साहित्यिक आविष्काराला अधिक वाव देण्यासाठी प्रेरणा दिली जाते. पदवी स्तरावर अध्ययन करणाऱ्या कवी-लेखकांच्या साधनेस दिलेली संधीच होय. सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षात कु.प्राजक्ता साखरकर, बी.ए.भाग-३, हिंदी हिने लिहिलेल्या 'रयत माऊली : लक्ष्मीबाई भाऊराव पाटील' या व्यक्तिचित्रणात्मक लेखास शिवाजी विद्यापीठाचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

'त्रिवेणी'चे अंतरंग विद्यार्थीनी पूरक नानाविध उपक्रमांनी सजलेले, नटलेले व बहरलेले आहे. कु.नम्रता काटवटे, सचिव व गुणवत्ताप्राप्त, बी.ए.भाग-३, कु.दिपाली काळे, बी.ए.भाग-१ गुणवत्ता प्राप्त आणि कु.प्रियांका भोसले, बी.ए.भाग-२ या तिन्ही विद्यार्थीनींना विद्यापीठाच्या परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळविले आहे. तसेच विविध खेळामध्येही आमच्या विद्यार्थीनी कमी नाहीत. यामध्ये कु.प्रणाली गायकवाड बी.ए.भाग-३ हिने सातारा विभागीय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये ६९ वजन गटामध्ये प्रथम क्रमांक तर कु.पूजा टिळेकर बी.ए.भाग-२ हिने सातारा विभागीय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये ६० किलो गटामध्ये प्रथम क्रमांक, कु.मेघा बनसोडे बी.ए.भाग-२ हिने सातारा विभागीय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये ५४ किलो गटात द्वितीय क्रमांक तसेच कु.तेजल खोत हिने शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये सहभाग दर्शविला आहे.

'त्रिवेणी' अंकाचे अंतरंग फुलविणारे सर्व लेखक, कवी, संपादक मंडळातील माझे सर्व सहकारी, प्रिंट ओम ऑफसेट व टाईप इनोव्हेटर्सचे व्यवस्थापक व त्यांचे सहकारी आणि आम्हां सर्वांना वेळोवेळी मार्गदर्शन करणारे आमच्या महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे साहेब या सर्वांच्या ऋणातच राहणे मी पसंत करेन.

**प्रा. डॉ. तानाजी पाटील**
प्रमुख संपादक

# मराठी विभाग



"मार्ग आमुचा रोधू शकती ना धन ना दारा
घरची वा वितभर कारा
मानवतेचे निशाण मिरवू महासागरात
जिंकुनी खंड खंड सारा.
चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती
कथा या खुळ्या सागराला
अनंत आमुची ध्येयासक्ती अनंतन् आशा
किनारा तुला पामराला."

– कवी कुसुमाग्रज

## त्रिवेणी

सन २०१७-२०१८



विभागीय संपादक

डॉ. सुनील चंदनशिवे

सहन करत इ.स.१८४८ मध्ये त्यांनी पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली.

लवकरच पुण्यात मुलींच्या आणखी दोन शाळा त्यांनी सुरू केल्या व स्त्रियांना शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देऊन, त्यांच्या उद्धाराचा मार्ग सुकर केला. जोतिबांच्या या स्त्री शिक्षणाच्या क्रांतिकारी चळवळीला त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंनी मोलाची साथ दिली. समाजाकडून होणारी निंदा, नालस्ती सहन करीत त्यांनी मुलींच्या शाळेत शिक्षिकेचे काम केले.

**अस्पृश्यांचे शिक्षण :**

शेकडो वर्षे दारिद्र्यात पिचलेल्या व अज्ञानाच्या अंधःकारात चाचपडणाऱ्या कनिष्ठ वर्गाला ज्ञानाचे दरवाजे उघडून देण्याचे कार्य जोतिबांनी केले. व्यक्तिस्वातंत्र्याचे हक्क, सामाजिक समता प्रस्थापित करणे व माणूस म्हणून जगण्यास समर्थ बनविणे या ध्येयाने जोतिबांनी अस्पृश्य समाजाला शिक्षण देण्यास प्रारंभ केला. या समाजाला बौद्धिक, सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी शिक्षणाचा प्रभावी मार्ग त्यांनी अंगीकारला. प्रचलित शाळेत अस्पृश्यांना प्रवेश दिला जात असे म्हणून इ.स.१८५१ मध्ये अस्पृश्यांच्या मुलांसाठी त्यांनी शाळास्थापन केली व अस्पृश्यांच्या शिक्षणाला चालना दिली.

**शेतकरी व कामकरी यांचे शिक्षण :**

शेतकरी व कामकरी यांच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन करण्याचे साधन शिक्षण हेच आहे. यांची त्यांना जाणिव होती. शेतकऱ्यांनी, कामकऱ्यांनी आपली मुले शाळेत पाठवली नाहीत. तर समाजाचे व पर्यायाने देशाचेच नुकसान होईल हे स्पष्ट करताना ते म्हणतात, शेतकरी कामगारांच्या मुलांना धंदेशिक्षण मिळाले तर ती आपोआप धंद्याकडे वळतील व कुमार्गाला लागणार नाहीत. परिणामी सामाजिक स्थैर्य धोक्यात येणार नाही. उलट राष्ट्रीय उत्पन्नात वाढच होईल. शेतकऱ्यांच्या शिक्षणासाठी जोतिबांनी स्वतःच्या घरी रात्रशाळा सुरू केली होती.

१९ ऑक्टोबर १८८२ रोजी हंटर आयोगाला त्यांनी जे निवेदन सादर केले. त्यातून त्यांना अपेक्षित असणारे शिक्षणाचे स्वरूप व त्यांची शिक्षणाविषयीची मते स्पष्ट होतात, ती पुढीलप्रमाणे -

**सामान्य जनतेला शिक्षणाचा अग्रहक्क :**

सरकारच्या महसुलामधील मोठा हिस्सा श्रमिकांच्या कष्टातून उभा राहतो. परंतु सरकार उच्चशिक्षणावर जास्त पैसा खर्च करते व सामान्य जनतेच्या त्याचबरोबर उच्चवर्गीय लोक आपल्या शिक्षणाची काळजी घेण्यास असमर्थ असल्यामुळे त्यांच्याकडे कमी लक्ष देऊन सामान्य जनतेच्या शिक्षणाकडे सरकारने लक्ष अशी अपेक्षा ते व्यक्त करतात.

शिक्षण हे वरच्या वर्गाच्या परातून खालच्या वर्गाच्या स्वाभाविकपणे झिरपत जाते. असा त्या काळात शिक्षण तत्त्वविचार प्रचलित होता. त्या काळातील बहुतांश विचारवंताचे हेच मत होते. जोतिबांनी मात्र वरिष्ठ वर्गातील लोक कनिष्ठ लोकांमध्ये शिक्षणप्रसार करतील हे सरकारचे सुखस्वप्न आहे प्रतिपादन केले.

**सक्तीचे शिक्षण व शिष्यवृत्त्या :**

बहुतांश शेतकरी व गरीब वर्गातील मुले आर्थिक परिस्थिती प्राथमिक शिक्षणाचा फायदा घेऊ शकत नव्हता. परंतु प्राथमिक शिक्षण हे मुलभूत स्वरूपाचे व महत्त्वाचे असल्यामुळे शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसारासाठी १२ वर्षे वयोमर्यादा पर्यंत ते सक्तीचे करावे असा आग्रह त्यांनी सरकारकडे धरला होता. त्याचप्रमाणे त्यांनी आपली मुले शाळेत पाठविण्यास उत्तेजन मिळावे आणि त्यांच्या शिक्षणाची गोडी उत्पन्न व्हावी यासाठी शिष्यवृत्त्यांची सहाय्य वार्षिक बक्षिसांची प्रलोभने सरकारने ठेवावीत अशी त्यांची होती.

**कनिष्ठ जातीसाठी स्वतंत्र शाळा :**

जोतिबांच्या मते जातीपातीच्या पूर्वग्रहदुषित दृष्टिकोनामुळे कनिष्ठ वर्गाला इतर वर्गाच्या बरोबरीने वर्गात बसण्याची परवानगी मिळत नाही. म्हणून ते कनिष्ठ वर्गाला या शाळांतूनच प्रवेश मिळत जात नाही म्हणून सरकारने मोठ्या शहरातून खास शाळा स्थापन केल्या होत्या पण त्यांची संख्या कमी होती. यावर उपाय म्हणून ज्या ठिकाणी कनिष्ठ जातीची पुरेशी मोठी वस्ती असेल त्या ठिकाणी स्वतंत्र शाळा उभाराव्यात अशी त्यांची मागणी होती.

**शिक्षक :**

शिक्षक प्रशिक्षित असला पाहिजे व तो शक्यतो शेतकरी वर्गातील असावा कारण असा शिक्षकच समाजातील कनिष्ठ स्तरातील लोकांशी तत्परतेने एकरूप होईल. त्यामुळे वरिष्ठ वर्गातून आलेल्या शिक्षकांपेक्षा हे शिक्षक बहुजन समाजावर हितकारी प्रभाव पाडू शकतील अशी जोतिबांची धारणा होती.





**व्यावहारिक शिक्षण :**

म.जोतिबा हे व्यवहारिक शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. त्याकाळी सरकारी महाविद्यालयातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे स्वरूप अत्यंत निरूपयोगी होते असे त्यांना वाटते. तसेच विद्यार्थ्याला भविष्यामध्ये स्वतंत्र जीवन कसे जगावे, स्वतःचा विकास कसा करावा असे त्यांना वाटत होते. अशा विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप देवून भविष्यामध्ये त्यांनी स्वतःचे जीवन सफल करावे, पण त्याबरोबर त्यांना सामाजिक जीवनाची भान असावे असे त्यांना वाटते.

**शिष्यवृत्तीचे धोरण :**

सरकारी शाळांमधून सरकारी शिष्यवृत्ती देण्याची प्रथा होती. ही प्रथा फुले यांना सदोषी वाटते या पद्धतीमुळे काही ठराविक विद्यार्थ्यांनाच याचा फायदा होत असे म्हणून ही पद्धत बदलावी असे ते म्हणत.

**व्यावसायिक तांत्रिक शिक्षण :**

बेरोजगारीवर मात करण्यासाठी व्यावसायिक शिक्षणाचा पर्याय ते सुचवितात. शाळा कॉलेजातून जेवढे लोक शिकून बाहेर पडतात तेवढ्या सर्वांना नोकरी मिळणे शक्य नाही म्हणून अभ्यासक्रमात तांत्रिक आणि व्यवहारोपयोगी शिक्षणाचा अंतर्भाव असावा असा आग्रह धरताना ते सांगतात. परिणामी हाताने कष्टाची कामे करणे किंवा अन्य रोजगारधंदे स्वीकारणे त्याला अवघड जाणार नाही.

**उच्चशिक्षणासाठी बहिःस्थ पद्धतीचा पुरस्कार :**

जोतिबांच्या मतानुसार उच्चशिक्षण हे सर्वांना परवडणारे असावे व ज्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेणे परवडणार नाही त्यांच्यासाठी बी.ए.एम.ए. पदव्यांच्या परीक्षांसाठी खाजगी अभ्यासाला मान्यता द्यावी.

पददलीत समाजाचा उद्धार हेच महात्मा फुलेंनी आपले जीवित कार्य मानले होते. त्या समाजामध्ये शिक्षणाचे बीजारोपण करून त्याला प्रेरणा व चालना देण्याची महत्त्वपूर्ण म. फुले यांनी केली. त्यांच्या शिक्षणविषयक विचारांमध्ये उपेक्षितांच्या शिक्षणाचा विचार अग्रक्रमाने दिसून येतो. म. फुले यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक तसेच शैक्षणिक चळवळीला एक वेगळे परिणाम लाभले.

❑ ❑ ❑ ❑

## फुलांनी पुन्हा हसावे

त्या चंद्रसूर्य ताऱ्यांना, फुलांनी हास्य द्यावे
त्यांचे ते दूर अंतर, क्षणात दूर व्हावे
गंभीर सागराला, फुलांनी हास्य द्यावे
गांभिर्य भव्य त्याचे, त्याच्या तळी बुडून जावे
आपल्या जीवनातही क्वचित दुःख यावे
पाहता क्षणी फुलांना तेही दूर जावे
माझ्या जुन्या जखमांना, फुलांनी हास्य द्यावे
मी पुन्हा नव्याने, हसून सारे दुःख विसरून जावे
पण सांगा तुम्ही फुलांनो, आम्ही काय करावे?
फुलेच उदास झाली तर, आम्ही कुठे पहावे?
भरभरून दिले आम्हां जे, ते सुख थोडे घ्यावे
आमच्यासाठी फुलांनी पुन्हा एकदा हसावे !
.....फुलांनी पुन्हा एकदा हसावे !

**कु.प्रणाली मदन जाधव**
बी.ए.-भाग १

## होळी व धुलिवंदन संदेश

शोक व खिन्नता विसरून जावे आणि हर्षाने,
प्रसन्नतेने विभोर व्हावे-हा होळीचा संदेश आहे.
नाना प्रकारच्या रंगांनी अंगावरचे कपडे रंगविणे व
असा रंग खेळताना अधूनमधून कोणी चिखल-माती
सुद्धा उडवितो. अर्थात रंगाच्या वर्षावासोबतच
धुळीचाही प्रयोग होतो, त्याला म्हणतात धूळवड.
आपल्या जीवनातही अनेक प्रकारचे हर्ष व शोक
येतील, अनेक प्रकारचे प्रसंग येतील आणि अशा
रंगीबेरंगी परिस्थितींवर शेवटी एक दिवस धूळ पडेल
या गोष्टीचा संदेश ही धूळवड देते.
पृथ्वीची धूळ आणि आकाशाच्या इंद्रधनुष्यीरंगांचे
मिलन अर्थात आपल्या जीवत्व आणि शिवत्वाचे मिलन-
हा धूलिवंदनाचा संदेश आहे.



**कु.शिवानी आबासो ठाकर**
बी.ए.-भाग २

# पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील : जीवन व कार्य

कु.कांचन पाटणकर, बी.ए.भाग-३

माणूस ही एकच जात आणि मानवता हाच धर्म ही आदर्श विचार ज्योत कर्मवीरांच्या जीवन दृष्टीत रुजली होती. बहुजन लोकांच्या विरोधाला न जुमानता वसतिगृहे, शाळा, महाविद्यालये सुरू केली. कर्मवीरांच्या व्यक्तिमत्त्वाला धर्मातील एकात्मता, स्वातंत्र्य आणि समता इ. मुल्यांचे हुबेहुब दर्शन होते.

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगे महाराज, वि.रा.शिंदे आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या आदर्श विचारांनी भारावलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील. एका शेतकरी जैन कुटुंबात २२ सप्टेंबर १८८७ रोजी हातकणंगले तालुक्यातील कुंभोज जि.कोल्हापूर येथे त्यांचा जन्म झाला. भाऊरावांचे घराणे तसे मध्यमवर्गीय, पण सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक जाण असणारे होते. शैक्षणिक परंपरा त्यांच्या घरामध्ये नसली तरी थोर समाज सुधारकांचा विचार त्यांच्या एकूणच कुटुंबावर होता. सामान्य वर्गातील मुले-मुली शिकली पाहिजेत, ती स्वतःच्या पायावर उभी राहून आपले घर सांभाळले पाहिजे या आदर्श विचारांचे भाऊरावांचे घराणे होते. हेच गुण भाऊरावांच्या बाल मनावर रुजले. त्यांचे वडील पायगौंडा पाटील हे रेव्हेन्यू खात्यामध्ये नोकरीला होते. त्यांनी भाऊरावांना कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये शिकण्यास ठेवले होते. पण त्या वयातही समाजातील जातीयता भाऊरावांना अस्वस्थ करी. याच शाळेत भाऊरावांचे इंग्रजी सहाव्या इयत्तेपर्यंत शिक्षण झाले. भाऊराव हे विद्यार्थीदशेत जैन बोर्डिंगमध्ये राहत होते. भाऊरावांच्या जीवनात एक गोष्ट अशी घडली की त्यामुळे त्यांना समाजकार्याची प्रेरणा मिळाली. एके दिवशी राजर्षी शाहू महाराजांना 'मिस क्लार्क' हॉस्टेलच्या अस्पृश्य विद्यार्थिनींसाठी काढलेल्या उद्घाटनासाठी बोलविले होते. त्यावेळी भाऊरावांनाही तेथे आमंत्रित केले होते. कार्यक्रम संपल्यानंतर भाऊरावांना अंघोळ करून येण्यास सांगितले. कारण त्यांनी अस्पृश्यांना स्पर्श केला म्हणून. पण भाऊरावांना हे काही पटले नाही, त्यांनी त्याच वेळी नकार दिला, म्हणून वसतिगृहातून त्यांना बाहेर काढले. त्यावेळी भाऊरावांचे स्नेही श्री. खानविलकर यांच्या आग्रहास्तव भाऊराव राजवाड्यावर राहण्यास गेले. तेव्हा तेथे त्यांना राजर्षी शाहू महाराजांच्या सर्व कार्याची माहिती मिळाली. तेव्हापासून त्यांनी सामाजिक कार्याची प्रेरणा आत्मसात केली.

सन १९५४ मध्ये याच राजाराम हायस्कूलच्या शताब्दी महोत्सवाला त्यावेळचे भारताचे उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन उपस्थित होते. त्यांच्याशी भाऊरावांची ओळख करून दिल्यानंतर भाऊराव मिरकीलपणे त्यांना म्हणाले; 'या शाळेच्या कुठल्याही वर्गात कुठल्याही वर्षी कुठल्याही विषयात पास झालो नाही असा मी विद्यार्थी आहे.' भाऊरावांचे शिक्षण जरी कमी असले तरी विचाराने ते महान होते. बहुजन वर्गातील मुले-मुली शिकावी याच उद्देशाने त्यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये ज्ञानाचा प्रसार केला, त्यासाठी त्यांनी उद्योग व्यवसायिकांच्या कडून धन मिळवण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना अपयश आले. भाऊराव कोल्हापूरला शिक्षण घेत असताना ज्ञानदेव घोलप (गाव सरूड,







ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) या गरीब व अस्पृश्य मुलांस त्यांनी कोल्हापूर येथे शिक्षणाची संधी प्राप्त करून दिली हाच भाऊरावांचा पहिला विद्यार्थी होय. भाऊराव पाटील यांचे अथक परिश्रम आणि असिम त्याग शैक्षणिक क्षेत्रातील नेत्रदीपक यश सर्वांबद्दल जनतेने त्यांना 'कर्मवीर' ही उपाधी देऊन गौरविले. समाज, कुटुंब, धर्म, संस्कृती आणि देश हे घटक समजून घ्यावयाचे असतील तर शिक्षण हे महत्त्वाचे आहे हे त्यांनी समाजाला पटवून दिले आणि त्यादृष्टीने कर्मवीरांनी खेड्यांपासून ते शहरांपर्यंत शैक्षणिक शाखा उभ्या केल्या.

सन १९१९ मध्ये कराड तालुक्यातील काले या गावी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्यांच्या कार्यामागचे विचारसूत्र असे होते की, 'शाळा तेथे बोर्डिंग', 'बोर्डिंग तेथे विहीर', 'विहीर तेथे शेती', 'शेती तेथे कष्ट' आणि कष्ट तेथे सुयश' असे सूत्र भाऊरावांनी आत्मसात केलं. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात वसतिगृहे, प्राथमिक शाळा, माध्यमिकशाळा, महाविद्यालये असा हा रयत शिक्षण संस्थेचा वटवृक्ष संपूर्ण महाराष्ट्रात फोफावला आहे. त्यांच्या कार्याची पावती त्यांना मिळाली. महात्मा गांधीजींनी त्यांना गौरविले तर पुणे विद्यापीठाने त्यांना 'डी लिट' ही सन्मान पदवी दिली तर महाराष्ट्र शासनाने त्यांना 'पद्मभूषण' म्हणून गौरविले.

कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्यामुळे महाराष्ट्राचा चेहरा-मोहरा बदलला. त्यामुळे आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकारामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांना मानाचे स्थान आहे. जात-पात आणि धर्म यांच्या पलीकडे जाऊन कर्मवीरांनी माणसातला माणूसपणा जागा केला.उच्च ध्येय, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक जाणीव आणि मानवतावाद या आदर्श मूल्यांची बिजे बहुजनांमध्ये रुजविली म्हणूनच महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या विकासामध्ये रयत शिक्षण संस्थेचे महत्त्वाचे स्थान आहे. रयत शिक्षण संस्थेच्या छोट्या रोपट्याचे रूपांतर वटवृक्षात झाले असून त्यास अनेक फांद्या फुटलेल्या आहेत. ''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' या ब्रीद वाक्यातून कर्मवीरांचा शैक्षणिक दृष्टीकोन स्पष्ट होतो. कर्मवीरांनी घालून दिलेल्या नैतिक मुल्यांच्या संदर्भात केलेल्या कार्याचा उहापोह पुढीलप्रमाणे करता येईल -

**श्रमप्रतिष्ठा :**

भाऊरावांनी 'श्रम' हे सर्वात श्रेष्ठ मानले. कोणत्याही समाजाची प्रगती व्हावयाची असेल तर श्रम महत्त्वाचे आहे. कोणतेही काम करताना लाज न बाळगता स्वतःला झोकून देऊन कष्ट केले पाहिजे. हा आदर्श कर्मवीरांनी बहुजनांना दिला 'केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे' या म्हणीनुसार प्रथम अण्णांनी श्रम केले मग सांगितले. श्रमातून कामाचे महत्त्व कळते. श्रम माणसाला प्रतिष्ठा मिळवून देते. श्रमाबद्दलचे संस्कार आदरयुक्त भावना हा गुण विद्यार्थी जीवनामध्ये आला पाहिजे असे त्यांचे मत होते. 'कमवा व शिका' 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' ही तत्वप्रणाली रयत शिक्षण संस्थेत प्रत्यक्षात अमलात आणली. आज अनेक विद्यापीठ व महाविद्यालयात ही आदर्श योजना राबविली आहे.

**राष्ट्रप्रेम :**

राष्ट्रप्रेम प्रत्येक व्यक्तीच्या रक्ता-रक्तात हवे. स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, छ.शाहू महाराज, महात्मा फुले आणि कर्मवीर भाऊराव पाटील हे महापुरुष राष्ट्रप्रेमाने भारावलेले होते. त्यांच्या नसानसात राष्ट्रभक्ती भिनली होती. त्यांनी तळागाळातील लोकांना पुढे आणले. दलित व पददलितांच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र प्रयत्न केले. कर्मवीरांनी बहुजन विद्यार्थ्यांना शिक्षणावरोबरच राष्ट्रप्रेमाचे धडे गिरवायला लावले. थोडक्यात कर्मवीर हे सर्वसामान्यांना 'शैक्षणिक दृष्टी' देणारे क्रांतीवीर होते.

**स्त्री पुरुष समानता :**

कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई पाटील या उभयंतांनी स्त्री-पुरुषांसाठी चळवळ उभी केली. समाजातील प्रत्येक कुटुंबातील स्त्री शिकली पाहिजे तरच ते कुटुंब सुखी व संपन्न होईल असा विश्वास या उभयंतांना होता. या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले. १९४२ मध्ये रयत शिक्षण संस्थेमध्ये जिजामाता अध्यापिका विद्यालय स्थापन केले. तसेच भीमाबाई आंबेडकर यांच्या स्मरणार्थ एक महाविद्यालय सुरू केले. सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे या स्त्रीयांच्याप्रमाणेच लक्ष्मीबाई पाटील यांनी सर्व जाती धर्म विसरून सर्व स्त्रीयांना एकत्र केले व ज्ञानदानाचे काम केले. कर्मवीरांनी आपल्या अनेक शाळांना बोर्डिंगना महापुरुषांची नावे दिली. स्त्री-पुरुष समानतेबद्दल नवविचारांचे बीजारोपण प्रत्यक्ष केले. कर्मवीर हेच महाराष्ट्राचे खरे शिल्पकार आहेत.

**बहुजनांच्याबद्दल कळवळा :**

कर्मवीरांना लहानपणापासूनच अस्पृश्य समाज, बहुजनसमाज यांच्याबद्दल अतिव कळवळा होता. बहुजनांची मुले शिकली पाहिजेत

आणि स्वतःचे कुटुंब उत्तम सांभाळले पाहिजे. हे त्यांना स्वप्न प्रत्यक्षात पूर्ण केले. शिक्षणाची गंगा अण्णांनी खेड्यापाड्यां पासून शहरांपर्यंत पोहचवली. यातूनच कर्मवीरांचा बहुजनांबद्दलचा कळवळ व्यक्त होतो.

**वक्तशीरपणा :**

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा प्रत्येक क्षेत्रात वक्तशीरपणा होता. ते स्वतः हाती घेतलेले काम वेळेतच पूर्ण करत असत. आजचे काम आजच करीत असत. तसे विद्यार्थ्यांनाही सांगत असे. कर्मवीरांनी शिक्षणाचे कार्य बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांपासून सुरु केले. वेळ ही कोणासाठी थांबत नाही हे विद्यार्थ्यांना पटवून सांगत असत. मोठी ध्येये मनात बाळगावी आणि त्यादृष्टीने आपले प्रयत्न चालू ठेवले पाहिजेत त्यासाठी प्रथम वेळेचे नियोजन करता आले पाहिजे.

**वैज्ञानिक दृष्टीकोन :**

आज सर्वच विज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती झालेली दिसते, पण अजूनही समाजात अज्ञान, अंधश्रद्धा, रूढी-परंपरा दिसून येतात. माणसाला माणूस न म्हणणारी काही बंधने ह्या देशातील कर्मठ समाजकंटकांनी निर्माण केली त्याला मूठमाती देण्याचे कार्य कर्मवीरांनी केले. शिक्षणाच्या माध्यमातून कृतीने करून दाखविले. ज्ञान हा माणसाचा तिसरा डोळा आहे हे कर्मवीरांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.

**सर्वधर्म सहिष्णूता :**

माणूस ही एकच जात आणि मानवता हाच धर्म ही आदर्श विचार ज्योत कर्मवीरांच्या जीवन दृष्टीत रूजली होती. कर्मठ लोकांच्या विरोधाला न जुमानता वसतिगृहे, शाळा, महाविद्यालये सुरु केली. कर्मवीरांच्या व्यक्तिमत्त्वाला धर्मातील एकात्मता, स्वातंत्र्य आणि समता इ. मुल्याचे हुबेहुब दर्शन होते. महात्मा गांधी, छत्रपती शाहू महाराज यांच्या विचाराने भारावलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे कर्मवीर अण्णा होय. कर्मवीरांनी समता, स्वातंत्र्य आणि बंधूभाव या आदर्श मुल्यांची जाणीव करून दिली. देव दगड धोंड्यात नाही तर तो माणसाच्या हृदयात आहे हे अण्णांनी पटवून दिले.

अशा रितीने कर्मवीरांनी फक्त विद्यार्थीच घडविले नाही तर त्याबरोबर समाजाला एक आदर्श घालून दिला आहे. शिक्षण हे सर्वांना मिळावे, जात कोणतीही मानू नये, श्रमाची लाज बाळगू नये आणि आपण सर्व एकच आहोत हा आदर्श विचार त्यांनी समाजात रूजविला. आज रयत शिक्षण संस्थेत अठरा पगड जाती-धर्मांचे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, तसेच सेवकही काम करीत आहेत या सर्वांचे श्रेय कर्मवीर अण्णांना द्यावे लागेल. आयुष्यभर जनसामान्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी झटलेला या कर्मवीरांच्या जीवनाची अखेर १९५९ मध्ये झाली. कर्मवीरांच्या या आदर्श विचारांचा ठसा मानव पृथ्वीतलावर आहे, तोपर्यंत राहील.

## जात

आणू नका कुणीही हटकून जात माझी
जगणार मी ना येथे लपवून जात माझी
टाचू कुणाकुणाचे आयुष्य मी कळेना
ते राजरोप गेले उसवून जात माझी.
रक्तामध्येच ज्यांचा जातीयवाद आहे
पुसतात तेच सारे, हटकून जात माझी.
माणूस देव माझा, मी भक्त माणसाचा
आधीच टाकली मी, ठरवून जात माझी !
फुकुन कान त्यांनी नेला प्रकाश तरीही
दारात सूर्य आला विसरून जात माझी

**कु.स्नेहल राजेंद्र माने**
बी.ए.-भाग १



## मैत्रीण

लांबचा पल्ला गाठताना,
दूर दूर जाताना.
दुःख सारी सोडायला,
ठेच लागताना सावरायला,
चुकीच्या वाटेवर आवरायला.
मी असेन नेहमीच तुझ्या बरोबरचं
तुझ्या प्रश्नांची कोडी सोडवायला....
तुझी मि मैत्रीण

**कु.दिव्या विजय देशमुख**
बी.ए.-भाग १





ललित

# काही विचार, काही अपेक्षा

**कु.नम्रता नारायण काटवटे,** बी.ए.भाग-३

''दुसऱ्या देशांशी चांगले संबंध असणे हे देखील एखाद्या देशाच्या शाश्वत विकासाचे लक्षण आहे. भारत या बाबतीत खूप चांगल्या प्रकारे वाटचाल करत आहे. आणि या सर्वांचा फायदा भारताच्या सर्वांगीण विकासात होणार आहे.''

विद्यार्थीदशेत साहित्य, निबंध, चित्रकला, हस्ताक्षर, गायन, वादन, संभाषण, क्रीडा आपली प्रतिक्षा करीत असतात. पण आपली प्रतिक्षा अखेर धुळीस मिळते. अवघ्या सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरी लिहू शकतात, छत्रपती गड जिंकू शकतात. १६व्या वर्षी दहावीच्या मुलाला नागराजच्या फण्यावरील १०चा अंक आठवतो. साधं पोस्टर रजिस्टरकरणं..दमरून सोडतं. हीच एक शोकांतिका आहे.

आम्हाला वाचायचा कंटाळा येतो. लिहायला थकवा येतो, नेहरूंनी, इंदिराजींनी पत्रे लिहिली. चांगदेवांनी, ज्ञानदेवांनी कोरा कागद पाठविला. शिवरायांनी औरंगजेबाना पत्रे लिहिली. गांधीजींनी व्हाईसरॉयना पत्रे लिहिली, डॉ. बाबासाहेबांनी वैचारिक लेख लिहिले. आपणास परिक्षेतील पत्र लिहिणं सुद्धा डास चावल्याप्रत होतं. एस.टी.च्या काचा, सार्वजनिक स्थळी भविष्यात जीवनात केव्हा अंधःकार पसरवतल हा उजेड वेळ निघून गेल्यावर डोक्यात पडतो.

श्रीकृष्णाजी भगवद्गीता आम्ही हातातसुद्धा घेतलेली नसते. पण श्रीकृष्ण लीला ऐकवत असतात. स्टॅण्डला गोकूळ समजून 'सडक-सख्या हरी' ही पदवी विनासायास मिळवलेली असते. मुक्या चेहऱ्याने व वखवखलेल्या नजरेने प्रेमाची भीक मागणारे सुशिक्षित भिकारी ही संस्कृतीप्रधान देशाची शोकांतिका आहे.

लहान बालकाचे पुरुषात रूपांतर करायला एका मातेला २५ वर्षे लागतात. पण एकापुरुषाचे मुर्खात रूपांतर करायला एका परस्त्रीला २५ सेकंदसुद्धा लागत नाहीत. तरीही आम्ही एकतर्फी प्रेमाच्या गावी जात असतो. आणि उर्वरित प्रवास दर्दभरी गाणी ऐकत जीवनाची वाट वहिवाटत असतो. छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, वि.दा.सावरकर, सुभाषचंद्र बोस, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक हे खऱ्या अर्थाने हिरो होते. पण पडद्यावरचा हिरो आमच्या अंतःकरणात घर करतो व घरघरच आमच्या अंतःकरणाला वेघर करते.

एडस्ला जगात औषध नाही. तरीही पाय गैररस्त्याला जायचे थांबत नाहीत. अज्ञान, औत्सुक्य, चंगळवाद इ. शेवट काय, तर टाचा घासून या सुंदर जगाला, सुंदर जीवनाला अपघाती निरोप द्यावा लागतो.

''माथ्यात गाथा, हातात कुराण आणि अंतःकरणात बायबल सामावले, तर आम्ही जगाला सावरू असा प्रचंड आत्मविश्वास असणारा युवक आज देशाची भूक आहे.''



अन्नातील भेसळीपेक्षा, वैचारिक भेसळ घातली आहे. हे आपण आज अनुभवतो आहे. एक आई ५ मुलांना सांभाळते; पण ५ मुले मिळून एका आईला सांभाळू

शकत नाही. एवढं दौर्बल्य आमच्या वाट्याला येत आहे. आईस्क्रिम खायला मिळत नाही म्हणून टॉन्सिलचे ऑपरेशन करूया ही वृत्ती सोडली, तरच हा प्रश्न सुटणार आहे.

तेव्हा सिंहतुल्य युवकमित्रांनो आपल्यात स्वामीजींचा 'विवेक', बुद्धांची 'करूणा', देशूंची 'सेवा परायणता', कबिरांचे 'कुबेरत्व', अरविंदांचा 'योग', ज्ञानदेवांचे 'पसायदान', बाबासाहेबांचे 'व्यासंग', महर्षींचरांची 'महानता', श्रीकृष्णाची 'भगवद्गीता' आपल्या आचरणात असायला हवी. विनोबांची भूदान चळवळ पायी चालत होती. गांधीजींची पदयात्रा देशप्रिय होत होती.

आम्ही आमचे पाय जड करून ठेवले. वाहन, व्यसनाधिनता आली. गरज असो-नसो, वाहन चालवणे येऊ लागले. मोबाईल आणि वाहन कसे, कधी आणि किती वापरायचे विसरल्याने आमचे शत्रू झाले. शरीराला गुलाम करतो तो आजाराला सलाम करतो. आज आतंकवादाचे थैमान आहे. उघड्या डोळ्यांनीपाहत आहे. कामटे र साळसकर सर, ओंबळे सर हे वीर शहीद होत आहेत. आम्हाला अजूनही एकीने जागृत होणं गरजेचे आहे. ओशोंची मधुरता, बसवेश्वरांची संदेश, शहीदांना सलाम, सॉक्रेटीसचे समस्त देशाला ताठ मानेन उभे करावे असे आहे.

"इतर देशांनी भारताचे अनुकरण करून भारताला महासत्ता देश म्हणाले."

शहीदांना सलाम !

जय हिंद !!



## समाज

समाजाच्या प्रथांमुळे,
त्यांना वाटते आम्ही देव...
त्यांच्यासाठी एक विचार मन, विचारांत काळजी सोने
झाले ढगांतून काढण्यापेक्षा केलं एकदं सहानुभव
करीत हाते परिवारांत कारे असे रडत खडत जीवन
नेहमीच कष्ट करत राहत पहा
आज पुन्हा एक परिवाराच्या पाठी कन्हेया
केले "तू म्हण तरी काय" असे विचारणारे तरी कोण?
"समाजाचे डर" म्हणून मान रात-भर
अशी मरणाची वाट बघत जिवंत तू आम्हाला सोडून
समाजाच्या विचारांचे हे अन्न रो दिवस
कधी तर मनाचे हे दिन काळजीत देत
कष्ट पाडी आम्ही लढत हे बदलतील.

**कु.निता शंकरराव**
**बी.ए.-भाग १**



## कॉलेजमधील जीवन

जसं नेहमी आमच्याबरोबर हा होतं
पहिल्यांदा सर्वांप्रमाणेच college शेअर वाटतं
अचानक एक दिवस तो गोड चेहरा वर्गात येतो.
आणि अख्खी college life बदलून जाते.
मग प्रकाश लेक्चर असले तरी वर्गात बसावेसे वाटते
Result येत नसला तरी Practical करावेसे वाटते.
लायब्ररीमध्ये तासन् तास पुस्तकं वाचून जातात
पुस्तकातली नाही तरी मनातली चार पाने वाचून होतात.
Extra lecture देतो तरी आपली त्याला ना नसते
आता तर रविवार पण college मध्ये यायची तयारी असते
असं करता करता.....
college ची वर्षे निघून जातात
जाता जाता कॉलेजमध्ये मात्र
विद्यार्थी आपले देऊन जातात.

**कु.मोनिका संभाजी जाधव**
**बी.ए.-भाग १**





पुस्तक परिचय

# घुसमटलेल्या मनाची प्रांजळ आत्मकहाणी : सराट्यातील पाऊलं

**कु.प्रियांका चंद्रकांत बाबर, बी.ए.भाग-१**

> या आत्मकथनाचे वेगळेपण मला हे जाणवते की, "लेखकाच्या संपूर्ण जीवनावर, त्यांच्या मनावर त्यांच्या वडिलांची "छाप" पडलेली दिसते. नव्हे तर ह्या आत्मकथनात संसाराचा सारा भार "आई"च उचलते, परंतु तिचे कष्ट, शिस्त, कडक स्वभाव हा मनाला भावून लेखकाच्या प्रामाणिक स्वभावात झळाळून जातो.

दलित आत्मकथने ही दलित साहित्याची एक मोठी जमेची बाजू आहे. अंतर्मुख करायला लावणारी चिंतनशिलता व प्रांजळ आत्मकथन हे आत्मकथन साहित्य प्रकारचे वैशिष्ट्य होय. या आत्मकथनाला आंबेडकरी चळवळींची प्रेरणादायी पार्श्वभूमीने या लेखकांना शिक्षित केले आहे. त्यांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क देऊन शिक्षणाबद्दल गोडी निर्माण करून त्यांना लिहिते केले.

शंकरराव खरात, दया पवार, केशव मेश्राम, शांताबाई कांबळे, बेबी कांबळे, पार्थ पोळके, शरणकुमार लिंबाळे, कुमुद पावडे, दादासाहेब मोरे, लक्ष्मण गायकवाड, लक्ष्मण माने, मल्लिका अमरशेख, रामचंद्र झोडगे, कुमार आम्बदेव, गंगाधर पानतावणे, किशोर काळे इत्यादि ची आत्मकथने म्हणजे त्यांच्या मनातील ठसठसणाऱ्या वेदना होत्या. अस्वस्थ मनानी केलेली कथने होती. ही जशी गावकुसाबाहेरील जीवनाची आत्मकथने होती तशीच आत्मकथने आयुष्यभर उपरे जीवन जगणाऱ्या भटक्या विमुक्तांचीही होती. पोटासाठी देश प्रदेश सोडून मिळेल ते काम करून पोट भरणाऱ्यांचीही होती. पोटासाठी देश प्रदेश सोडून मिळेल ते करून पोट भरणाऱ्यांचीही होती. उदाहरणार्थ लक्ष्मण माने- "उपरा", दादासाहेब मोरे-"गबाळ", भिमराव गस्ती यांचे "बेरड", लक्ष्मण गायकवाड यांचे "उचल्या", रामराव झुंजारे "झुंज", नाजूबाई गावित-"अटोरे"; किशोर काळे यांचे "कोल्हाट्याचे पोर"; भिमराव जाधव-"आत्मकथन काटेरी तारेच्या कुंपणाची"; "भट्टी ओतान्याची"-चंद्रकांत गाडेकर; अशी ही आत्मकथने सांगता येतील. कर्नाटक, आंध्र सिमावर्ती भागातून तेलुगू, कन्नड भाषिक दक्षिण राज्य सोडून महाराष्ट्रातील एका मोठ्या निरण गावात पोटाची खळगी भरण्यासाठी भांबुरी समाज येऊन स्थायिक झाला आणि सोलापूरचा होऊन गेला. या जातीतील एका उच्च पदवी संपादन केलेल्या सुजाण प्रांजळ तरुणाची जीवघेणी "घुसमट म्हणजे सराट्यातील पाऊलं" हे आत्मकथन होय. श्री. गुरुनाथ संगटे हे कन्नड तेलगू भाषिक, पण मराठी भाषेची उच्च पदवी संपादन केलेले, मराठी भाषेवर नितांत प्रेम करणारे एक लेखक होते.

घरात अठराविश्वे दारिद्र्य आई, आणि अण्णा (वडील) सतत राबत, आईचा कडक स्वभाव, वडील मात्र भोळ्या स्वभावाचे. लेखकावर त्यांचा फार जीव, कधी दुखत पोरांच्यावर सतत प्रेम करणारा अण्णा कधी घरात असायचा नाही, खाण्या-पिण्याची आबाळ होतेय म्हणून विकत नसे. एवढेच काय, निरर्थक काम करताना दारूच्या नितांनी त्यांची चेष्टा केली. तर ते सरळ ढोले भरून लढून मुलासारखे आपल्या बायकोला सांगत आणि मग लेखकाची "माय" निरमीच्या मेटवर उभी राहून आपल्या नवऱ्याला विदीविच्या विडंबनाऱ्यांची खरडपट्टी काढे. आईचा स्वभाव कडक शिस्तीचा, मुलांना वळण लावावं म्हणून तिने कधीच अट्टहास करून मुलांच्या बुद्धीवर पांघरूण घातलं नाही. स्वतः आयुष्यभर कष्ट राहिली. भोळ्या नवऱ्याला "बा" नाही तिने सांभाळले.

सोलापूर शहराच्या वडार वस्तीत साध्या भाड्याच्या घरात राहून हा एवढा मोठा संसाराचा गाडा चालविताना त्यांची दमछाक होऊन जाई. कधी कधी लेखकाला "माय" म्हणायची, "तुझी शाळा कधी संपतीय आणि तुला कधा नोकरी लागतीय बा? आम्ही मेल्यावर तुला नोकरी लागणार काय?" अशी दबाव मायची ऐकल्यावर लेखक अस्वस्थ होतो. एकूणच सर्वसामान्यांचे जीवन आणि त्यांनी आपल्या शिकलेल्या पोरांवर असणारी

मिळत या ठिकाणी जायचे. बुडबुडत्या तारेच्या ओंगर कोसळत असताना एखाद आशेचा किरण त्यांना दिसत असतो. पण तो "कुकर" होत जातो. लेखक दहावी पास होऊन बारावीपर्यंत शिकूनि कुठेतरी नोकरी करावी म्हणतो. पण कॉलेजात गेल्यावर केवळ बिरुद त्यांच्या डोळ्यासमोर येते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सारखं शिकावं. प्राध्यापक व्हावं. आपण सुटबुटात कॉलेजला यावं असं वाटत असताना त्यांच्या जीवनावर सतत आघात होत जातात. "बी.ए." होऊन आता नोकरी करावी म्हणत असताना उच्च पदवीचे वेध लागतात. घरात तर बाबा ही नेहमी म्हणायचे, "बाबानो, शिक्षण अर्ध्यावर सोडून देऊ नका. आम्ही आहोत तोपर्यंत तुम्हार. मोठे व्हा" म्हणून ते सतत कष्टातून सांभायचे. लक्ष्मी-विष्णू मिल मधून निवृत्त झाल्यावर त्यांनी सतत संसारात मदत केली. कधी इतरांसारखे नवे कुठल बसले नाहीत. आईची वहाणखडून काने करायचे. लेखक एके दिवशी म्हणतो, "मुधार शिवणा चालायच्या मुख्या, कामगारातील लिंगकोळ मिळता आणून घातला मुडमुडू बाबा किडीचा ये-जा करायचे, कंटाळा आलाय म्हणून एकंदर कधीच घायचा नाही." या वाक्यातून लेखकाच्या बाबाच्या टिकाणी असणारा मोठा पद, कुटुंबावर प्रेम आणि मोडक्या तोडक्या संसारातील मते पण झाकल्यात त्यांचा प्रयत्न पाहून मन हेलावून जाते. पुढे ते म्हणतात, बाबांनी कधी आराम निवांत, सुखात आयुष्य घालवलं म्हणून वक्कत अक्कत लढवली नाही. लग्न झालेल्या लेखकाच्या घरात रात्री कधी त्यांनी मुक्काम केला नाही. "अन्न्या" मोठा गुणी आणि मुक्काम होता. प्रत्येक दलित लेखकांनी "आईची" महती सांगितली, प्रत्येकाने "माझी माय" म्हणून विच्यावर गौरव गुणगे उधळले. परंतु या आत्मकथनाचे देवळेपण नवा हे जाणविते की, "लेखकाच्या संपूर्ण जीवनावर, त्यांच्या मनावर त्यांच्या वडिलांची "छाप" पडलेली दिसते. नव्हे तर ह्या आत्मकथनात संसाराचा सारा भार "आई"च उचले, परंतु तिचे कष्ट, शिस्त, कडक स्वभाव हा सर्व अन्न्याच्या प्रेमळ भावुक मोकळ्या प्रामाणिक स्वभावात झाकून जातो. आणि संपूर्ण आत्मकथनात "अन्न्या" आपल्या हृदयाला पीळ पाडून जातो. सराव्याचा काट्याची जशी वेदना असते तशी वेदना निर्माण करतो. त्यांच्या जीवनाचा शेवटही असाच जीवाला चटका लावणारा. कुणाला त्रास नाही, कष्ट देणे नाही; सेवा करून घेणे नाही; झोपेतच मृत्यू येणे हे मोठे भाग्यच म्हणावे लागेल. अशाप्रकारे, या आत्मकथनातील आईपेक्षा वडिलांचे मोठेपण, त्यांचा प्रेमळ स्वभाव, मुलांवर मायेची पाखरं घालणं हे आत्मकथनातील वडिलांच्या चित्रणापेक्षा वेगळेच चित्रण [illegible]

याशिवाय, या आत्मकथनात येणारी पात्रे, [illegible] रब्बू हनाल, स्मशानात राहणारा, आयुष्यभर [illegible] पण त्याच्या अंत्ययात्रेस १५च माणसं घेऊन [illegible] अकली एडका, मिन त्यांची प्रेम कहाणी [illegible] ही सर्व पात्रे लेखकाची जवळची म्हणून येतात [illegible] बद्दलची कळकळ आहे. हानूमुती यातून येतात [illegible] पात्रांच्या आणि लेखकाच्या जीवनाचा [illegible] असे नाही. परंतु लेखक ह्या "व्यक्तिचित्रणात" [illegible] दिसतो. उदाहरणार्थ प्रेमाचा प्याला मृग[illegible] रस्त्यावरची वाटनारी, मोतीबागेतील [illegible] ही पात्रे लेखकाच्या भोवती येतात असे नाही [illegible] घटना व्यक्ति म्हणून येतात.

आत्मकथनात आपल्या वैयक्तिक जीवनातील [illegible] येणारी पात्रे, त्यांच्या आपल्या जीवनातील [illegible] असे चित्रण यावयास हवीत. उदाहरणार्थ अक्करमाशी [illegible] आजोबा, विठ्ठल कांबळे, जमादार, लिंबाळे हे पात्र [illegible] जीवनातील अप्रत्यक्ष घटक होते. त्यामुळे शरणकुमार [illegible] कथा सलगपणे पुढे सरकत जाते, वाचक [illegible] प्रस्तुतच्या आत्मकथनातील १ ते १५ प्रकरणे [illegible] बालपणाच्या शाळेतील जीवन सोडले तर [illegible] नाही. शेवटी-शेवटी त्यांचे आत्मकथन सुरू होते [illegible] प्रकरणातून ते व्यक्त होते. हे आत्मकथन जरी [illegible] वाटले तरी ते एका प्रांजळ, नम्र, प्रामाणिक [illegible] जांबमूनी समाजाचे संघर्षमय जीवन चित्रित केले [illegible] एकट्याचे न राहता, जांबभूमी समाजाचे दुःख [illegible] भाषा कानडी वळणाची, पुल्लींगी वाक्याची [illegible] किंवा कर्ता, कर्म, क्रियापद अशी रचना न करता [illegible] रचना होताना दिसते. परंतू ह्या सर्व चुकांकडे दुर्लक्ष [illegible] आत्मकथन हे निश्चितच एक चांगले प्रांजळ, प्रामाणिक मनाचे धगधगते स्पंदन आहे असे वाटते. त्याने या [illegible] लेखकांच्या आत्मकथनाच्या राशीत निश्चित भर घातली [illegible]

□ □ □ □





# सुरवी जीवनाचा ठेवा, अनुभवातून चिंतनाकडे

कु.विद्या विजय गोळे, बी.ए.भाग-१

वैचारिक

> लेखिकेची विचारशीलता व गौतमबुद्धाच्या विचाराशी असणारी समरसता दिसून येते. धर्म म्हणजे काय? त्याची व्याख्या करताना त्या म्हणतात एकमेकांवर प्रेम करणं. एकमेकांच्या मदतीला धावणं. एकमेकांच्या दुःखात सामील होणं म्हणजे धर्म. माणसाने माणसासारखं वागावं. हे वागणं म्हणजे धर्म.

मानवी जीवनातील अनेक तऱ्हेच्या सुखदुःखाचा विचार नेहमीच सुंदरतेच्या सुमनावर करणाऱ्या लेखिका विचारवंत, पेशाने शिक्षिका असणाऱ्या डॉ.नसिमा पठाण यांचे 'अनुभवातून चिंतनाकडे' हे पंधरावे पुस्तक म्हणजे मानवी जीवनाच्या संचिताचा ठेवा आहे असे वाटते.

आजच्या युगामध्ये या पुस्तकातील विचार जगण्यावर नितांत श्रद्धा ठेवून आवती-भोवतीचे जग कसे आहे, त्यातील वैविधता दाखवून कधी चिंतन तर कधी सुंदरतेचा आस्वाद घ्यावयास शिकवेल यात शंका नाही. म्हटलं जातं आजकालचे आदर्श संपलेत, परंतु आदर्श कधी संपत नसतात. तशी दृष्टी ठेवणारी माणसं संपलीत म्हणून शाळा कॉलेजमधून विद्यार्थ्यांचे आदर्श कोणते असावेत यावर 'विद्यार्थ्यांचे आदर्श' या लेखात त्यांनी विचार मांडले आहेत. मन आणि मनाची शांती कशी ठेवावी. शिक्षणामुळे मानवी जीवनात काय घडेल हे सांगताना त्या म्हणतात, माणसा-माणसातील दुरावा कमी होईल. बुद्धी, निष्ठा, विवेक निष्ठा वाढेल. शिक्षण हे माणसाच्या मनाचे भरण पोषण करतात. जसे अन्न शरीराचे पोषण करते, म्हणून प्रत्येकाने शिक्षण घेतले पाहिजे. तो एक पवित्र धर्म आहे त्याचे पावित्र्य ठेवावे. ते ठेवत असताना मनाची प्रसन्नता असावी, त्याला आवरणे कठीण असते. ते चंचल असते. बहिणाबाई चौधरी म्हणतात, मन वढाय वढाय, उभ्या पिकातलं ढोरं अशा या मनाला ताब्यात ठेवून प्रसन्न, निर्मळ बनवावे नाहीतर मन निर्मळ नसेल तर साबण लावून तरी काय उपयोग, त्याने मन स्वच्छ होणार आहे का? त्यासाठी मनाला ताब्यात ठेवून शांती, शितलता निर्माण करून सुंदर जीवनाचे अधिष्ठान निर्माण करावे. सर्व जग हेच माझे घर असावे असे समजावे. सत्य धर्माने वागावे. जीवनात येणारी माणसं ओळखा. बाह्य रंगावर माणसाचं व्यक्तिमत्व अवलंबून असत नाही. त्यांच्या अंतःकरणात काय दडलंय ते पहावं. त्याचे कर्तृत्व पहावं. श्री संत चोखामेळा एका अभंगात म्हणत,

> "ऊस डोंगा परी रस नोव्हे डोंगा
> काय भुललासी वरलिया रंगा"

तसे माणसाने वरल्या रंगाने भुलू नये हा लेख या पुस्तकाची उंची वाढवणारा वाटतो. कारण जगात मानवी जीवनाचा उद्धार करण्यासाठी जे तत्त्वज्ञान गौतमबुद्धांनी दिले आज आपल्या जीवनातून हद्दपार होत आहे. लेखिका म्हणते, 'भगवान बुद्धांनी पंचशीलाचा महसंदेश आम्हा मानवाला जीवनाची शिदोरी म्हणून दिला. तो पचविण्याची ताकद आमच्यात कुठं उरली आहे.' परंतु तो संदेश पचविण्याची वेळ आज आली आहे. या लेखावरून लेखिकेची विचारशीलता व गौतमबुद्धाच्या विचाराशी असणारी समरसता दिसून येते. धर्म म्हणजे काय? त्याची व्याख्या करताना त्या म्हणतात एकमेकांवर प्रेम करणं. एकमेकांच्या



मदतीला धावणं. एकमेकांच्या दुःखात सामील होणं म्हणजे धर्म. माणसाने माणसासारखं वागावं. हे वागणं म्हणजे धर्म. नावात काय स्वतःला ओळखा किंवा अलिकडच्या काळात प्रसारमाध्यमामुळे तरूण पिढी कशी बिघडत चालली आहे त्याकडे लक्ष वेधताना त्या म्हणतात, सावधान, इकडे लक्ष द्या. मनाचा अभ्यास रेशीमबंध. तू सूर्यपुत्र होशील का? 'सज्जन दुर्जन', 'घर हरवलं आहे', 'प्रेमा तुझा रंग कसा' असे सुंदर लेख या पुस्तकात समाविष्ठ केले आहेत.

हे पुस्तक वाचताना निश्चित एका विचार बागेत फिरून, विचाराची टपोरी फुलं वेचून, त्याची माळ करून गळ्यात घालून मिरवावं आणि त्यादृष्टीने आपली ही विचाराची बाग फु... जीव अधिकच सुंदर करून जगावं असे वाटू लागते. ... माणसाला हे पुस्तक वाचायला मिळाल्यावर त्याच्या जीवन... परिवर्तन घडेल त्याचे जीवन विचारशील बनेल यात श...

**'अनुभवातून चिंतनाकडे'**

डॉ.नरिमा पठाण, श्रातुसत्व प्रकाशन, सोलापूर

❑ ❑ ❑

## आनंद

काय-काय करावे तुझ्यासाठी,
तुला मिळवण्यातच खरी शांती आहे.
तुझ्या शिवाय करमत नाही,
तू सर्वांनाच हवा आहे.

प्रत्येकाच्याच जवळच असतो,
पण ताब्यात ठेवता येत नाही...
मोकळा सुटलाच तर?
सर्व जण पाहातच राहतात.



त्याच्यासाठीच धावपळ करतात,
कोणाला सापडले त्यांचे भाग्य,
खरा डोसळंच त्याला हेरतो,
जपूनी अंतःकरणात ठेवतो.

मोजले तर भाव कळत नाही,
कोणाही जवळ टिकून राहिल.
याचा भरोसा नाही...
रडणाऱ्यालाही हसवतो.

अति झाला तर, त्यालाही फसवतो.
तो अमर्याद असूनही
त्याला मर्यादित करायलांच हवं
त्यासाठीच सगळ्यांनी झगडायचं आहे.

**कु.निता गणेश संकपाळ**
बी.ए.-भाग २

## माझी आई



आठवण येते त्या दिवसांची
ठिगळं जोडताना वापरलेल्या सुयांची
ठिगाळं जोडताना,
किती वापरल्यास गं सुया
सुटणार नाही गणित
अशी तुझी माया.
शाळेतून माझा चिमणा,
अजूनि येईना कसा?
म्हणूनी रस्त्यावरती येऊनी,
तिचा जीव होई वेडापिसा
माझ्या चिमण्याला काय घालू गं घास
याच विचाराने धरत होती ती उपवास
उपाशी पोटी आई जात होतीस गं रानात
सांग एवढी ताकद कुठून आली गं तुझ्या अंगात?
माझा चिमणा शिकावा हाच तुझा ध्यास
त्याचसाठी कष्ट उचलीत होतीस तू माय रात्रं-दिव...
दुधावरची साय तशी तू माझी माय
तुझ्या कष्टाला या जगी जोडंच नाय,
या जगी जोडच नाय,
अशी गं तू माझी माय
अन् या जगी तुला तोडंच नाय
या जगी तोडंच नाय

**कु.प्रणाली ...**





ललित

## सोना

**कु.पुजा विठ्ठल चंदुगडे**, बी.ए.भाग-२

**२ ऑक्टोंबरची ती रात्र पाऊस खूप जोरजोरात पडत होता, कुत्री भुंकत होती, रातकिडे किरकिरीत होते. वाऱ्याचा वेग वाटला होता. सगळीकडे काळोख होता. मनात अनेक शंका येत होत्या. इतक्यात बाहेर ओरडण्याचा आवाज आला आणि सोना मला कायमची सोडून गेली ही बातमी समजली.**

लहानपणापासून आम्ही दोघी एकत्रच वाढलो. आमचे प्राथमिक शिक्षण आमच्या गावातच झाले. पुढच्या शिक्षणासाठी आम्हाला परगावी जायला लागायचे, तिथे आम्हाला खूप मैत्रिणी भेटल्या, पण आमच्या दोघींच्यात कधीच अंतर पडले नाही. सोना खुप सुंदर दिसायची. कोवळी, कोवळी गोरी त्वचा, काळेभोर केस, घारे डोळे आणि नाजूक ओठ असं तिचं व्यक्तिमत्व होतं. ती हसायला लागली की तिच्या गालावर खळी पडायची. तिचा स्वभाव मनमिळावू होता. वडिलधाऱ्यांशी ती आदराने बोलत असे, सगळ्यांना ती हवीहवीशी वाटे. आमचा S.S.C.चा निकाल लागला आणि आमच्यात दुरावा आला. मी कला शाखेत प्रवेश घेतला आणि तिने विज्ञान शाखेत. तिची घरची परिस्थिती बऱ्यापैकी होती. आम्ही वेगवेगळे झालो असलो तरी आमची मैत्री पहिल्यासारखीच होती. आम्ही दोघी एकाच बसने प्रवास करायचो. अकरावीत असताना तिने मला एका व्यक्तीविषयी सांगितले. ती कोणतीच गोष्ट माझ्यापासून लपवत नव्हती. ती मला बोलली माझं एका मुलावर प्रेम आहे. त्यानंतर तो तिच्या आयुष्यात आला आणि तिच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. आमच्या दोघींमधले बोलणे खूप कमी झाले होते. दिवस चालले होते आणि ती त्याच्यात गुरफटत होती.

काही दिवसांनी गणपतीचे आगमन झाले. संपूर्ण गावात मंगलमय वातावरण निर्माण झाले. हा सण आमच्यासाठी खूप आनंदाचा. कधी एकदा बाप्पा येतात असे आम्हाला होऊन जायचे, कारण आमचा आगळावेगळाच ताल गावात असायचा. त्या दिवशीही तसंच काही झालं, ती काकुंना म्हणाली, 'मला गौरीचं सामान आणायचंय, दर वर्षी तेच-तेच जुनं वापरायचं. मी यंदा नवीन आणणार आहे.' असं ती काकुंना म्हणाली, तसं सांगून ती घरातून निघाली. तेव्हा तो तिला भेटला आणि ती त्याच्यासोबत गेली. जात असताना उंब्रज पोलीस स्टेशन समोर त्यांची गाडी एका ट्रकने उडविली; तिला खूप लागलं होतं रक्ताच्या थारोळ्यात ती पडली होती. एखादी आई आपल्या बाळाला जशी कुशीत घेते तशी त्याने तिला उचलून घेतली आणि इकडे तिकडे धावू लागला. काही लोकांनी त्याला मदत केली आणि सह्याद्री हॉस्पिटलला तिला नेलं. जेव्हा मला समजलं तेव्हा मी जागच्या जागीच स्तब्ध झाले. मला काहीच सुचत नव्हतं. मी जोरजोरात रडत होते. तिला ॲडमिट केल्यावर त्याने दुसऱ्या दिवशी कराडमधील ब्रिटीश पुलावरुन नदीत उडी मारली. तो पूल भयंकर मोठा होता. त्याची वाचण्याची शक्यताच नव्हती, पण योगायोगाने त्यावेळी मासे पकडण्यासाठी आलेलं एक जोडपं तिथं होतं, त्यांच्या जाळ्यात तो अडकला. त्या पती-पत्निंनी त्याला नदीतून बाहेर काढलं आणि हॉस्पिटलमध्ये नेलं.



पंधरा दिवस तिच्यावर सह्याद्री हॉस्पिटलमध्ये उपचार चालू होते. तिच्यात काहीच बदल होत नव्हता. म्हणून डॉक्टरांच्या सल्ल्याने तिला कोल्हापुरला प्रभू हॉस्पिटलमध्ये दाखल केलं. काकू तर खूप खचून गेल्या होत्या.

त्या सतत रडत होत्या. कारण सोना काकुंची एकुलती एक मुलगी होती.. तिला भाऊ आहे पण तोही डोक्याने जरा मंद आहे. फक्त काकुंना तिचाच आधार होता.

२ ऑक्टोबरची ती रात्र पाऊस खूप जोरजोरात पडत होता, कुत्री भुंकत होती, रातकिडे किरकिरीत होते. वाऱ्याचा वेग वाढला होता. सगळीकडे काळोख होता. मनात अनेक शंका येत होत्या. इतक्यात बाहेर ओरडण्याचा आवाज आला आणि सोना मला कायमची सोडून गेली ही बातमी समजली. मला हा धक्काच सहन होणारा नव्हता. मी धाडकन जमीनीवर कोसळले. रात्री अकरा वाजता कोल्हापुरवरून तिला गावात आणलं. तिचं संपूर्ण शरीर पांढऱ्या कापडाने बांधलेलं होतं. फक्त तिचा चेहरा दिसत होता. तेव्हा सुद्धा एखाद लहान बाळ झोपी गेल्यावर जसं गोंडस दिसतं तशी ती दिसत होती. माझ्या तोंडातून काहीच शब्द फुटत नव्हते. मी स्फुंदून स्फुंदून रडत होते. तिला पाहून मन भारावून गेलं होतं. त्यात पावसाचा [illegible] वाढला होता. वाऱ्याला वेगळीच दिशा निर्माण झाली होती. [illegible] नियतीला सुद्धा तिचं जाणं मान्य नव्हतं' असं मला वाटत [illegible] माझ्यापेक्षा काकुंची अवस्था खूप वाईट होती. 'सोना उठ ना [illegible]' म्हणून त्या रडत होत्या. त्यांच्या पोटचा गोळा देवाने हिरावून [illegible] होता. संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. हा [illegible] त्यांना सहन होणारा नव्हता.

सोना सोडून गेली त्याला बरीच वर्ष झाली तरी [illegible] माझ्या सोबतच आहे. असं मला दचकून सतत वाटतं. कधी [illegible] तिच्या आठवणीने डोळ्यात पाणी येतं. तिच्या जाण्यानं [illegible] मला फक्त दुःख मिळालं तिच्या आठवणींचं फक्त माझ्या [illegible] राहिया. ती कायमची सोडून गेली पण आठवणी मात्र मागे [illegible] गेली.

□ □ □ □



## कोण पाहिजे ?

जन्म द्यायला आईच पाहिजे
राखी बांधायला बहीणच पाहिजे
गोष्टी सांगायला आजी पाहिजे
हट्ट पुरवायला मावशी पाहिजे
पुरणपोळी भरवायला मामी पाहिजे
जीवनाच्या साथीला मैत्रिण पाहिजे
- Home-like atmosphere
- Building the true responsible citizens of future.

The students right from 11th std. to M.A., M.Phil etc. are eligible to be a part of 'Earn and Learn Scheme.' There is an interview for the students upon which it is decided whether they will get admission or not. The only eligibility for entering this scheme for education and he/she should be from poor economic conditions or from the socially backward communities.

A look at the nature of the 'Earn and Learn Scheme' shows that though it has undergone many physical changes, it has retained the core principle as it is. The basic principles upon which the Sanstha and also the scheme were established, are not changed. The work of this scheme is run under the supervision/ chairmanship of the Chirman of the 'Earn and Learn Scheme.' The students are supposed to work in different sections of the scheme atleast for four hours. The various sections of work in this scheme keep changing frequently. For instance, at the initial period the work was only in the limited sections, i.e., either in the field or

at the construction sites. But according to the changing era, certain sections like computer lab, accounting section, correspondence section, various offices etc. have been added to it. Also previously the students were allowed to work more than four hours. But as the competition has become very tough, there isn't permission for them to work more than four hours. It is also due to some other resons. Besides it will help the students to get more time to study. Besides these changes, the another good change is that of inclusion of girls in 'Earn and Learn Scheme.' Because now-a-days the girls also should be given equal opportunity to education.

The distinguishing thing regarding 'Earn and Learn Scheme' is its uniqueness. It is supposed to be the novel concept of Karmveer Anna in the world which eliminates all the boundries between various classes in the society. Such type of effort we can see in USA when Booker T. Washington refers to the Beria College in 1855, where the Blacks or Negroes and the Whites were living and learning on their own by doing various works. Eventhough the 'Earn and Learn Scheme' launched by Karmaveer Anna is unique.

The great work done by Padmabhushan Karmaveer Bhaurao Patil in the field of education became the mile-stone. It is impossible to neglect it. Karmaveer Anna is a great personality who not only made the masses to take education, but also he taught the principle of equality. Anna worked hard for the welfare of the masses and became the 'Karmaveer.' This father of the students learning in the Rayat Shikshan Sanstha made them the 'human' and also 'humane.'

❑ ❑ ❑ ❑

(......From page 29 onward)

**Net Banking :**

This does not involve any wallet and is simply a method of online transfer of funds from your bank account to another bank account, credit card or a third party. You can do it through a computer or mobile phone. Log into your bank account on the Net and transfer money via National Electronic Funds Transfer (NEFT), Real-Time Gross Settlement (RTGS) or Immediate Payment Service (IMPS).

**Plastic Money :**

This includes credit, debit and prepaid cards. The latter can be issued by banks or non-banks and can be physical or virtual. These can be bought and recharged online via Net Banking and can be used to make online or Point-of-Sale purchases, even given as gift cards.

❑ ❑ ❑ ❑





Portrait

## Mary Kom

Miss Punam Mahadeo Salunkhe, B.A.-II

*Mary Kom is famed as a five time World Boxing Champion and the only boxer to win a medal in every one of the six World Championships. In the 2012 Olympics, she became the first Indian women Boxer to quality and win a bronze medal in the 51 kg flyweight category of Boxing.*

Born on 1st March 1983, Mangte Chungneijang Mary Kom is an Indian Boxer from the northeast state of Manipur. She is also known as MC Mary Kom or Magnificent Mary. Mary Kom is famed as a five time World Boxing Champion and the only boxer to win a medal in every one of the six World Championships. In the 2012 Olympics, she became the first Indian women Boxer to quality and win a bronze medal in the 51 kg flyweight category of Boxing. She is currently ranked as Number 4 in AIBA World Woman's Ranking. Mary was born in Kangathei, is Manipur. She did her schooling from Lokatak the christion Model, High School, Moirng till. Class VI and studied in St.Xavier Catholic School, Moirang till class VIII. She then completed her schooling from Nlos, Imphal and did her graduation from Churachandpur College. Mary Kom is a mother of twin son's Rechungvar and Khupneivar and is married to K Onler Kom. She had an eager interest in Athletics since childhood and the success of Dingko Singh is what really inspired her to become a boxer.

**Career :**

Mary Kom's career started in 2000, after her victory in the Manipur State Women's Boxing Championship in West Bengal. In 2001, she started competing at international level. She was only 18 years old womn. She made her international debut at the first AIBA Woman's World Boxing Championship in United States. Winning a Silver Medal in the 48 kg Weight Category. In 2002, she won a Gold Medal in the 45 kg Weight category at the Cup in Hungary in the same year.

In 2003, Mary Kom won a Gold Medal in the 49 kg weight class at the Asian Woman's Boxing Championship in India and in 2004, she won a Gold medal at the Woman's Boxing World Cup in Norway. In 2005, she again won a Gold Medal at the Asian Woman's Boxing Championship in Taiwan and the AIBA Woman's World Boxing Championship in Russia both in the 46 kg weight class. In 2006, she won a Gold Medal at the Venus Woman's Box Cup in Denmark and won Gold again at the AIBA Woman's World Boxing Championship in India.

After a one year break, Mary Kom returned in 2008 to win a Silver Medal at the Asian Woman's Boxing Championship held in India and won a fourth successive Gold Medal at the AIBA Woman's World



वैचारिक

# भारतीय लोकसंख्येचा विस्फोट

कु.प्रियांका सुरेश माने, बी.ए.भाग-१

**वाढत्या लोकसंख्येला अडचण, समस्या न मानता लोकसंख्येकडे एक संधी म्हणून पाहावे लागेल. या प्रचंड जनतेला शिक्षण, प्रशिक्षण आणि सगळ्यात महत्त्वाचे प्रोत्साहन देण्याची गरज आहे आणि मग हीच प्रचंड लोकसंख्या भारताची ताकद म्हणून उभी राहील.**

**जागतिक लोकसंख्या वाढ :**

पृथ्वीची निर्मिती ४.५ अब्ज वर्षापूर्वी झाली होती आणि सूक्ष्मजीवांच्या रूपात जीवनाच्या रूपात जीवनाच्या अस्तित्वाची सुरुवात ही सुमारे ४.१ अब्ज वर्षापूर्वी झाली आहे. मानव हा सामाजिक प्राणी आहे. आणि त्यातूनच त्याच्या उत्क्रांतीची यात्रा सुरु झाली. आपले वंशज आग पेटवायला शिकले, गट तयार करणे आणि एकत्र राहणे सुरु केले. अशाप्रकारे हजारो वर्षांच्या प्रगतीनंतर समाजाची संकल्पना जन्माला आली. मग हे समाज वाढू लागले. एकोप्यामुळे दिर्घकाळ जगू लागले. जगाची लोकसंख्या वाढायला लागली, पण अनेक महाभयंकर आजाराने प्रचंड प्रमाणात लोक मरतही असत. जसे प्लेग आदी रोग.

जगाच्या लोकसंख्या वाढीमध्ये १९२० नंतर खूप मोठा बदल दिसला. इथे आपण समजण्याचा प्रयत्न करू की १९२० नंतर असे काय झाले? २०व्या शतकात औद्योगिक क्रांती झाली. माणसाची अवजड कामे मशिन्स करू लागली. नाना प्रकारचे शोध याच काळात लागले. गाड्या आल्या, टेलिग्राफ आले, विविध प्रकारच्या रोगांवर उपचार आले, व्यवसाय वाढले, जागतिक संपर्क वाढले. या सर्वांच्या फलस्वरूप माणसाचा जीवनकाळ वाढला, मृत्यू दर कमी झाले. वाढत्या समाजाला सपोर्ट करण्यासाठी वाढीव लोकसंख्येची गरज भासू लागली म्हणून खूप साऱ्या देशांनी बेबी बूमर्स जनरेशनला पाठिंबा दिला. या सगळ्याचा परिणाम असा झाला की, जगाची लोकसंख्या अभूतपूर्व दराने वाढू लागली.

**लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम (अडचणी/तोटे) सुविधांचा अभाव :**

वाढत्या लोकसंख्येमुळे आरोग्य, वैद्यकिय, स्वच्छता, अन्न आणि इतर अनेक सुविधा जनतेला पुरवताना सरकारला अडचण येते. सरकारी यंत्रणेमधला भ्रष्टाचार हा सुद्धा मोठा भाग आहेच, पण एखाद्या प्रचंड जनतेला मुलभूत सुख-सुविधा पोहचवणे सोपे काम नाही. युरोपियन किंवा अमेरिका देश त्यांच्या नागरिकांना मुलभूत सोयी खूप व्यवस्थित पुरवतात कारण भारताच्या तुलनेत त्यांची लोकसंख्या खूपच कमी आहे. स्विडन आणि डेन्मार्क या देशातील नागरिक जगातले सगळ्यात आनंदी मानले जातात. या देशांची लोकसंख्या क्रमशः ९९ लाख ते ५७ लाख इतकीच आहे. अमेरिका देश लोकसंख्येत तिसऱ्या क्रमांकावर येतो. पण त्यांची लोकसंख्या ही फक्त ३२.६ करोड आहे. जी भारताच्या लोकसंख्येत ११४ आहे. पण सन १९२१ ते १९५१ या ३१ वर्षांच्या काळात भारताची लोकसंख्या २५.१३ कोटींवरून ३६.१० कोटी इतकी



वाढली. म्हणजेच या काळात लोकसंख्येत ११ कोटींची भर पडली. लोकसंख्येचा एकत्रित वार्षिक वृद्धीदर या काळात १.१२ टक्के इतका राहिला. पण जननदर मात्र उच्च राहिला. सन १९२१ ते १९५१ या काळात मृत्यूदर हजारी ४९ वरून ३९.९ इतकाच कमी झाला. रोगांवर नियंत्रण ठेवण्यात यश आल्याने मृत्यूदरात घट झाली. या काळात लोकसंख्या हळूहळू वाढत राहिल्याने भारत लोकसंख्या संक्रमणाच्या टप्प्यात होता असे म्हटले जाते.

**शिक्षण, बेरोजगारी आणि गरिबी :**

भारतातील वाढती लोकसंख्या ही भारतातील प्रचंड बेरोजगारीला कारणीभूत आहे. चांगल्या प्रतीचे शिक्षण सर्व भारतीयांना मिळत नाही. भारतात जेवढे लोक आहेत तेवढ्या नोकऱ्या भारतात तयार होतच नाहीत आणि बिझनेससाठीही तेवढेच अनुकूल वातावरण नाही.

**प्रचंड गर्दी/शहरी स्थलांतर :**

गावाकडे पुरेसा करिअरसाठी संधी नसल्याने तरुण शहराकडे धावतात. यामुळे शहरात गर्दी होत आहे.शहरातील जागा, वाहतूक, पाणी पुरवठा यंत्रणा कमी पडते. स्थलांतरित लोक अनधिकृत झोपड्यांमध्ये खूप दयनीय परिस्थितीत राहतात. त्यांना चांगली वैद्यकिय सुविधा, शिक्षणही परवडत नाही आणि हे चक्र असेच चालू राहते.

**पर्यावरण समस्या :**

एका लहान क्षेत्रात राहणाऱ्या प्रचंड लोकसंख्येने सभोवतालच्या वातावरणात परिणाम नक्कीच होतो. इमारती, रस्ते, बांधण्यासाठी डोंगर झाडे कापली जातात. पाणी, माती, हवा प्रदूषित होत आहे. जंगली प्राण्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट झाले आहेत. जंगली प्राणी शहरात घुसून भयाचे वातावरण निर्माण करतात. अजूनही ग्रामीण भागात शेकडो वर्षे जुन्या प्रकारे शेती केली जाते. त्यामध्ये खूप सारी झाडे तोडली जातात, मातीची झीज होते. सुपिक मातीचा थर निघून गेल्याने पिकही योग्य प्रमाणात येत नाही. जाळ्यासाठीही खूप प्रमाणात लाकूडतोड होत आहे.

□ □ □ □

**वाढती लोकसंख्या लाभ/फायदे :**

वाढत्या लोकसंख्येचे फायदेही असू शकतात हे जरी ऐकायला विचित्र वाटले पण लोकसंख्या ही भारतासाठी एक मोठीच समस्या बनली असली तरी ती एका वेगळ्या दृष्टिकोनाने बदलली जाऊ शकते. वाढत्या लोकसंख्येचे फायदे किंवा सकारात्मक परिणाम काय आहेत हे जाणून घेऊयात.

भारतात ५०% पेक्षा जास्त जनता तरुण ३५ च्या खाली आहे. म्हणून भारताला एक तरुण देश संबोधले जाते आणि ही एक जमेची बाजू आहे. जपान आणि काही युरोपियन विकसित देशांमध्ये तरुण नागरिक खूप कमी आहेत. कुठल्याही देश चालवण्यासाठी तरुण कामगार, शेतकरी, प्रशासन, अधिकारी खूप गरजेचे असतात. भारताकडे हे भरभरून आहेत. यांना योग्य प्रशिक्षण दिले तर अख्या देशांमध्ये खूप चांगल्या नोकऱ्या मिळवू शकतात. [illegible] मोदी सरकारने "स्टार्टअप इंडिया", "मेक इन इंडिया" सारख्या योजना राबवल्या आहेत. म्हणून भारतीय जनतेला भारतात जास्त रोजगार उपलब्ध करून देण्याचा भारत सरकारचा प्रयत्न आहे.

**निष्कर्ष :**

वाढत्या लोकसंख्येमुळे भारतात सध्या खूप अडचणी आहेत आणि भविष्य देखील राहतील. पण याला अडचण, समस्या न मानता लोकसंख्येकडे एक संधी म्हणून पाहावे लागेल. या प्रचंड जनतेला शिक्षण, प्रशिक्षण आणि सगळ्यात महत्त्वाचे प्रोत्साहन देण्याची गरज आहे आणि मग हीच प्रचंड लोकसंख्या भारताची ताकद म्हणून उभी राहील. कोणत्याही देशाचा आर्थिक विकास आणि लोकसंख्येचे आकारमान यांच्यात निकटचा संबंध असतो. परंतु लोकसंख्या अतिरिक्त किंवा अपुरी झाल्यास आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. त्यामुळे देशात लोकसंख्या स्फोटाची अवस्था निर्माण झाली आहे. देशातील लोकसंख्या वृद्धीच्या कारणांचा आपण आढावा घेतला आहे.

माहितीपर

# जी.एस.टी.च्या निमित्ताने : वस्तूंचा जीवनक्रम

कु.प्रतिक्षा आनंदराव माने, बी.ए.भाग-१

**ब्रिटीशांच्या काळात त्यांनी जी करव्यवस्था आणण्याचा (अर्थात यशस्वी, कारण तेव्हा सरकार त्यांचं होतं) प्रयत्न केला त्यात पारंपारिक व्यापारी कुटुंबाचे (Vernacular Capitalists ... मारवाडी वगैरे) व्यवहार संशयास्पद ठरवले गेले.**

GST च्या निमित्ताने ज्या चर्चा चालू आहेत. त्या ऐकताना मनात काही प्रश्न आले. त्याचा संबंध प्रत्यक्ष वस्तू आणि सेवा कराशी नाही तर वस्तूंच्या जीवनक्रमाशी आहे. एखादी वस्तू उत्पादित होते. तेव्हापासून ते तिच्या ग्राहकाच्या हाती पडते. इथपर्यंतचा प्रवास अनेक टप्प्यांत होतो. ती वस्तू आणि तिच्याशी संबंधित प्रत्येक व्यवहार सरकारच्या म्हणजे कराच्या जाळ्यात कडकावेत अशी यंत्रणेची इच्छा असते, तर संबंधित व्यक्तीचे हितसंबंध पाहता तसं होऊ नये अशी किमान काही जणांची तरी इच्छा/अपेक्षा असणार. ह्याचे कोणकोणते प्रकार सांगता येतील आणि त्यात सरकारच्या नजरेतून ते सुटावं ह्याची कितपत शक्यता असते. असा माझा एक प्रश्न आहे.

**काही उदाहरण घेऊ.**

एखादा शेतकरी आपल्या देशात भाजीपाला पिकवत असेल आणि आठवडी बाजारात जाऊन तो विकत असेल.

आता ह्यात मधले लोक येतच नाहीत आणि हा व्यवहार रोखीचा आणि बिनापावतीचा असतो. त्यामुळे सरकारदरबारी इत्यादी ह्यांची नोंद होऊ शकणार नाही. पण वस्तूचा प्रवास मात्र कागदोपत्री येत नाही. इथे गंमत म्हणजे शेतकरी जी बियाणं, खत वगैरे विकत घेत असेल तो व्यवहार बहुधा रितसर होईल. म्हणजे त्याचा उत्पादन खर्च व्यवस्थेत नोंदला जातो. पण उत्पादन नोंदलं जात नाही.

**ह्याच्या दुसऱ्या टोकाचं उदाहरण म्हणजे कदाचित एखाद्या हाय टेक उद्योगाच असेल.**

ॲपल आपले फोन, टॅबलेट, संगणक वगैरे कुठे तरी चीनमध्ये बनवतं आणि भारतात विकतं. तुम्ही ते ऑनलाईन किंवा युनिकॉर्न वगैरेसारख्या दुकानातून घेऊ शकता. ह्यातल्या भारताशी संबंधित प्रत्येक टप्प्यात (आयात ते ग्राहकाच्या हातात) प्रत्येक यंत्राची प्रत्येक व्यवहारात नोंद होते. त्यामुळे ते सरकारच्या नजरेआड होत नाहीत आणि तरीही मला असं सांगण्यात येतं की स्मगल केलेल्या आयफोन वगैरेची एक समांतर बाजारपेठ जोरात आहे. मला ह्याचा प्रत्यक्ष अनुभव नाही. पण हे खरं असेल तर इथे अर्थात प्रत्येक वस्तूचा जीवनक्रमातला आणि व्यवहारातला प्रत्येक टप्पा सरकारची नजर चुकवून होत असणार.

**आता ह्या दोन टोकांच्या मधलं उदाहरण पाहू.**

समाज एखादी खाजगी उद्योजक (म्हणजे पब्लिक लिमिटेड वगैरे नसलेला लघुउद्योजक) एखादी FMCG वस्तू उत्पादित करतो आहे. उदा. लागणारा कच्चा माल तो काही सप्लायर लोकांकडून घेतो. कदाचित ते सचोटीने असतील किंवा नसतील. म्हणजे तो किती कच्चा माल आणि काय दराने घेतो. ह्याची कागदोपत्री नोंद








व्यवस्थित असेल किंवा अर्थहीन/खोटी अपुरी असेल. त्याचप्रमाणे तो उद्योजक साबणाच्या नक्की किती वड्या बनवतो. त्याची नोंद कदाचित व्यवस्थित असेल किंवा अर्धवट/खोटी अपुरी असेल आणि मग त्यानुसार पुढच्या टप्प्यातल्या प्रत्येक व्यवहाराची नोंदही व्यवस्थित असेल किंवा अर्धवट/खोटी/अपुरी असेल. ती अर्धवट/खोटी/अपुरी ठेवण्यात नक्की कुणाकुणाचं हित आहे? ज्याला कर भरावा लागतो. अशा प्रत्येकाचं हित त्यात आहे. (कर म्हणजे GST च असं नाही, तर आयकर किंवा इतर कोणतेही पूर्वीचे कर) म्हणजे अगदी ग्राहकापर्यंत हिंदुस्थान लिव्हर एकही साबण सरकारपासून कर लपवत नसेल. पण मग हा खोटा उद्योजक आपल्या साबणाची किंमत हिंदुस्थान लिव्हरपेक्षा पुष्कळ कमी ठेवून (ब्रँड कॉन्शन आणि कदाचित क्वालिटी-कॉन्शसही नसलेल्या) ग्राहकाचं (आर्थिक) हित साधत असेल.

ह्या साखळीतल्या सगळ्यांचं हित जर सरकारपासून लपवण्यात येत असेल तर कितीही ताकदीची असली तरी व्यवस्था त्याला कितपत पुरी पडू शकेल?

इतर अनेक उदाहरणं असतील, पण माझा मुलभूत प्रश्न हाच आहे. ह्याचा प्रतिवाद केला तर मला तो अर्थात आवडेल, कारण दोन नंबरचा धंदा चांगला आहे असं माझं अजिबात मत नाही. मात्र आतापर्यंतच्या म्हणजे GST - पूर्व काळामध्ये वस्तूंच्या ह्या जीवनक्रमातल्या प्रत्येक टप्प्यात सरकारची नजर चुकवण्यासाठी काय केलं जातं असे हे जाणून घेण्यातही मला तितकाच रस आहे.

**कारण :**

१. लोकांची खरी हुशारी त्यात दिसत असणार आणि म्हणून ते रोचक असणार असा माझा अंदाज आहे.

२. ते समजून घेता आलं तर GST ची नवी व्यवस्था दोन नंबरचे व्यवहार रोख्यातच कितपत यशस्वी होईल ह्याविषयीही काही आखाडे कदाचित बांधता येतील.

३. innovative व्यापाऱ्यांकडून सरकारची नजर चुकवण्याचे नवनवे मार्ग शोधले जातील हे वेगळंच. पण ते लक्षात यायला कदाचित अधिक वेळ लागेल. आताच कुणाला त्यातले काही माहित झाले असले तरीही ते इथे सांगता येतील.

**जाता जाता :**

एक अभ्यासू मित्रानं ह्याविषयी एका पुस्तकाचा संदर्भ दिला. ब्रिटीशांच्या काळात त्यांनी जी करव्यवस्था आणण्याचा (अर्थात यशस्वी, कारण तेव्हा सरकार त्यांचं होतं) प्रयत्न केला त्यात पारंपारिक व्यापारी कुटुंबाचे (Vernacular Capitalists : मारवाडी वगैरे) व्यवहार संशयास्पद ठरवले गेले. (rendering then illegitimate as economic agents) तरीही हे मारवाडी लोक ब्रिटीशांना पुरून उरले हे तर आपल्या डोळ्यासमोरचं वास्तव आहे. आताही ह्यांच्यातलेच अनेक लोक GST बद्दल उघड किंवा खाजगीत तक्रार करत आहेत. धंदा करण्यात त्यांची हुशारी तर पिढ्यान्‌पिढ्या कमावलेली आहे. त्यामुळेच खरं तर माझं कुतूहल जागृत झालं आहे.

❑ ❑ ❑ ❑

Boxing Championship. In India, in Chin, both were in the 46 weight catagory. In 2009, she won a Gold Medal at the Asian Indoor Games in Vietnam.

In 2010, Mary Kom won a Gold Medl at Asian woman's Boxing Championship in Kazakistan and the fifth Gold Medal in the AIBA Woman's World Boxing Championship in Burbados. She competed in the 48 kg weight class because AIBA had discontinuted using the 46 kg class. She also participated in the 51 kg weight class the Asian Games and won a Bronze Medal.

In the 2010 commonwealth games heldin Delhi, India. She had the Honour of holding the Queen's Boton along with Vijender Singh for the opening ceremony run the stedium. However, she did not compete as Woman's Boxing event was not included in the games. In 2011, she won a Gold Medal in the 48 kg weight class at the Asian Woman's Boxing Championship in Mangolia.

The 2012, London, Olympics brought her more respect and honour as she become the first Indian Woman Boxer to qualify and won a Bronze Medal at the Olympics. She took part in the 51 kg weight category and also became the third Indian woman to win an individual Medal at the Olympics.

In 2014 Asian games, she won a Gold Medal and created history for India. She won the gold in the Woman's Flyweight (48-52) kg division which was her first Gold Medal in the Asian Games.

❑ ❑ ❑ ❑




## *The Importance of Smile*

A smile is gifted by God
It shines your day
Sovles your problem in minute
It gives hope and beauty
Smile helps to fulfil duty
Smile makes you friendly
Smile collects friends
So smile and keep smiling
Smile keeps away sadness
It gives courage to be bold
Smile is not madnes
So smile and keep smiling
Smile is precious then diamond
Smile can not sold or purchased
Smile is a beautiful gift of God
So smile and keep smiling
Now think over it
Now, smile please

**Jyoti Thorat**
**B.A.III**

## *Leader And Boss*

Boss orders his men
Leader inspires them
Boss works with authority
Leader with good will
Boss means fear
Leader means respect
Boss says 'I'
Leader says 'We'
Boss knows who is wrong
Leader knows what is wrong
Boss knows how it is done
Leader knows how to do it
The Boss demands 'respect'
The Leader commands 'respect'

So friends,
Be Leader not a Boss

**Kajal Todkar**
**B.A.III**



# सामाजिकशास्त्रे विभाग



"साहित्यामध्ये जीवन
फुलविण्याची
अमर्याद शक्ती असते."

– यशवंतराव चव्हाण

# त्रिवेणी

सन २०१७-२०१८

विभागीय संपादक
प्रा. लालासाहेब पवार

# अंतरंग

गद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १) नोटाबंदी | कु.कोमल दत्तात्रय कोळेकर | बी.ए.भाग-१ | ३५ |
| २) जी.एस.टी.च्या निमित्ताने : वस्तूंचा जीवनक्रम | कु.प्रतिक्षा आनंदराव माने | बी.ए.भाग-१ | ३६ |
| ३) भारतीय लोकसंख्येचा विस्फोट | कु.प्रियांका सुरेश माने | बी.ए.भाग-१ | ३८ |
| ४) सुंदर जगण्यासाठी | कु.मयुरी कदम | बी.ए.भाग-१ | ४० |
| ५) स्त्रीभ्रुणहत्या | कु.ज्योती चंद्रकांत कोळेकर | बी.ए.भाग-१ | ४२ |
| ६) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक (टिळकयुग . १८८५ ते १९२०) | कु.प्रणाली गायकवाड | बी.ए.भाग-३ | ४३ |
| ७) ख्रिश्चन मिशनरी कार्य | कु.प्रियांका रविंद्र भोसले | बी.ए.भाग-२ | ४७ |
| ८) नेताजी सुभाषचंद्र बोस व आझाद हिंद सेना यांचे योगदान | कु.शितल वायदंडे | बी.ए.भाग-२ | ४९ |
| ९) इतिहास आणि व्यवसाय | कु.तेजू पवार | बी.ए.भाग-३ | ५१ |




वैचारिक

# नोटाबंदी

कु.कोमल दत्तात्रय कोळेकर, बी.ए.भाग-१

**सध्या निवडणुकांपूर्वी शेतकरी कर्जमाफीची आश्वासनं दिली गेली. निकाल लागल्यानंतर स्टेट बँकेच्या अध्यक्ष म्हणतात, शेतकरी कर्जमाफी शक्य नाही. मुख्यमंत्री म्हणतात, शेतकरी कर्जमाफी हा कायमस्वरुपी उपाय नाही.**

नोटाबंदीच्या निमित्ताने लोकांना स्वप्न दाखवली. भ्रष्टाचार संपणार, काला धन बाहेर निघणार, बँकांमध्ये पैसे जमा होणार, कर्जाचा व्याजदर कमी होणार, फक्त काही काळ थोडी कळ सोसा, देशाचे जवान सिमारेषेवर दिवस-रात्र उभे असतात, तुम्ही थोडा वेळ रांगेत उभा राहिलात तर काय बिघडलं, तुमच्या भल्यासाठीच तर चाललंय हे. पण याच नोटाबंदीच्या काळात २००० च्या नोटा पोलिसांनी छापे टाकून जप्त केल्या. त्या आल्या कुठून? या काळात व्यवहार मंदावले याचा फटका लघू उद्योग बाजारपेठ शेतकरी यांना बसला, पण हे सगळं दिसत नाही किंवा दाखवलं जात नाही. राष्ट्रीय उत्पन्न दरात काहीच घसरण नाही असं का? हे फक्त लोकांची दिशाभूल करण्यासाठी दाखवलं जातंय हा विचार सर्वसामान्य करणार. स्विस बँकेतला काळा पैसा आणणार. प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख जमा होणार हे तर जणू झालं मध्यंतरी जी कॅशलेसचा काळापुरताच प्रतिसाद दिला. आता जसं चलन उपलब्ध होत आहे, लोक रोख व्यवहार करत आहेत. आता याला काय म्हणतात. ही व्यवस्था शहरी भागातली. ग्रामीण भागात आजही राष्ट्रीय बँका नाहीत. त्यांच्या मुलभूत गरजांचे प्रश्न कायम आहेत. अशा लोकांना ऑनलाईन व्यवहार काय समजणार.

निश्चिलिकरण केल्यानंतर सर्व बँकांमध्ये मोठ्या प्रमाणावर रक्कम जमा झाली म्हणजे याचा अर्थ बँका श्रीमंत झाल्या असा सर्वसामान्यांचा गैरसमज आहे. कुठल्याही बँकेला खातेदारांना जमा झालेल्या पैशावर व्याज द्यावं लागतं आणि सध्या बँकांमध्ये खूप मोठी रक्कम आहे. बँकेच्या उत्पन्नासाठी बँका कर्ज वाटप करतात. पण सध्या कर्ज काढणाऱ्यांची संख्या वाढत नाही, मग बँकांनी त्याचं उत्पन्न वाढवण्यासाठी ठराविक मर्यादा किंवा व्यवहारानंतर चार्जेस लागू केले. सध्या सरकार हे चार्जेस कमी करा किंवा काढून टाका म्हणतंय, पण बँकांची परिस्थिती पाहता हे शक्य वाटत नाही. यात भर म्हणजे जनधन खाती नोटाबंदीच्या काळात या खात्यामध्ये मोठ्या प्रमाणावर रक्कम जमा झाली. ती सध्या काढता येत नाही. हुकुमावरून आमीर खानच्या बायकोने देश सुरक्षित नाही असे म्हणल्यावर ती देशद्रोही मोहमंद शामीच्या बायकोने स्लिव्हलेस घातला तर तिने चूक केली, तिने कोणते कपडे घातले पाहिजे हे कोण ठरवणार? मध्यंतर गुरमेहर कौर म्हणाली Pakistan doesn't kill my father war killed तर किती मोठी चूक झाली. तिला जीवे मारण्याच्या धमक्या आल्या. तिला देशद्रोही ठरवण्यात आलं. सध्या निवडणुकांपूर्वी शेतकरी कर्जमाफीची आश्वासनं दिली गेली. निकाल लागल्यानंतर स्टेट बँकेचे अध्यक्ष म्हणतात, शेतकरी कर्जमाफी शक्य नाही. मुख्यमंत्री म्हणतात, शेतकरी कर्जमाफी हा कायमस्वरुपी उपाय नाही. एकीकडे शेतकऱ्यांना मालाला योग्य भाग नाही. कर्जमाफीही नाही शेतकऱ्याने काय करायचं? यावर उपाय सांगा. निवडणूका प्रचारादरम्यान आश्वासने देणे ती पूर्ण न करणे लोकांना स्वप्नं दाखवून ती पूर्ण न करणे हा देशद्रोही नाही का? फक्त जवानांबद्दल देशाबद्दल आदर असणे म्हणजे देशप्रेम? हे सगळे कायम चर्चेत ठेवून कोणी तुमची दिशाभूल तर करत नाही ना? कायम या देशातला प्रचंड जनसमुदाय आजही मुलभूत गरजांसाठी झगडत आहे.

❑ ❑ ❑ ❑

ललित

# सुंदर जगण्यासाठी

कु.मयुरी कदम, बी.ए.भाग-१

तणावमुक्त जीवनासाठी अगोदर मनाची छान गुंतवणूक करावी लागत असते. एखाद्या कामात मन गुंतवावे लागत असते आणि काम करून कंटाळा आणि काम करता आलेला कंटाळा हे कंटाळ्याचे दोन प्रकार असतात. श्रमानंतर विश्रांतीचा आनंद काही वेगळाच असतो. त्यासाठी वेगवेगळी कामे करून गुंतवून घेतले पाहिजे.

माणसाचे व्यक्तिमत्त्व हे श्रेष्ठ जीवनमूल्य आहे. माणूस जेव्हा जन्माला येतो तेव्हा त्याच्या आयुष्याची पाटी अगदी कोरी असते. या पाटीवर कोणती अक्षरे गिरवली जातात त्याच्यावर जीवनग्रंथाचे मूल्य अवलंबून असते. प्रेमाची, त्यागाची, श्रद्धेची अक्षरे गिरवली तर जीवनग्रंथ मौल्यवान होतो. माणसाची सारी धडपड सुखसमाधानाने जगण्यासाठी चाललेली असते. हेच सुखसमाधान आपल्या आरोग्याशी निगडित असते. त्यावर माणसाचे स्वास्थ्य ठरत असते आणि आजारपणाचा अभाव म्हणजेच उत्तम आरोग्य नाही ठरत, तर मानसिक, शारीरिक, आध्यात्मिक सुस्थिती म्हणजे उत्तम आरोग्य.

इंग्रजीत आरोग्याला 'Health' हा शब्द वापरतात. या शब्दातील प्रत्येक अक्षरामागील भावार्थ जाणून घेतला तर व्यक्तिमत्त्वाला सुबक आकार आणि जीवनाला स्वास्थ्य प्राप्त होऊ शकते. सुंदर जगण्यासाठी हा शब्द आपण आपल्या आयुष्याच्या पाटीवर गिरवूया.

'Health' मध्ये पहिले अक्षर येते 'H' (एच) म्हणजे हॅबिट होय. सवय सवयीतून स्वभाव हा बनत असतो. आरोग्य सवयी, चुकीच्या समजूती आणि सदोष मूल्ये यामुळे अवघे जीवन दुःखमय होत असते. यासाठी ग्रंथालये, छंदवर्ग, चांगले विचार यात सहभागी होऊन चांगल्या सवयी जोपासल्या पाहिजेत.

'H' नंतर अक्षर येते 'E' (इ) म्हणे एक्साम आणि एक्सरसाईज म्हणजेच परीक्षा व व्यायाम होय. आयुष्याची हीच परीक्षा होत असते. त्यामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी व्यायामाची खूप गरज असते. व्यायाम केल्याने आपला मूड फ्रेश राहतो व कोणतीही कामे सहज करू शकतो. एके ठिकाणी या संदर्भात एक सुंदर सूत्र वापरले आहे. एकपट खाणे, दुप्पट पाणी पिणे, तिप्पट चालणे, चौपट हसणे आणि पाचपट आनंदी होणे. यातील हसणे, चालणे हा भाग व्यायामाशी निगडित असतो.

'E' नंतर येतो 'A' (ए) म्हणजे ॲटिट्यूड-दृष्टीकोन. आपला दृष्टीकोन जर सकारात्मक असेल तर अशक्य वाटणाऱ्या गोष्टी सहज साध्य होत जातात. कोणत्याही कामाशी हात घालताना नकारात्मक दृष्टीकोन हा असता कामा नये.

जसे तीन पाथरवट तीन मूर्ती बनवत होते. त्यांच्यासमोर दगड होते. पहिल्या पाटरवटाला विचारले, ''तू काय करतो आहेस?'' त्याने उत्तर दिले, ''काय म्हणजे काय? मी दगड फोडतोय. दुसऱ्या पाथरवटाला तोच प्रश्न विचारला. तो म्हणाला, ''पोटासाठी राबतोय. दुसरं काय?'' आणि तिसऱ्याला विचारले तर त्याने उत्तर दिले, ''समोरच्या मंदिरासाठी मूर्ती घडवतो आहे.''



तिघेही एकाच प्रकारचे काम करत बसलेले होते, पण मूर्ती घडवतोय म्हणणाऱ्याकडे सकारात्मक दृष्टी होती. त्यातूनच त्याच्या कामातही आनंद ओतला की जीवन एक रम्य खेळ होऊन जातो. ही झाली दृष्टीकोनाची बाब.

'A' (ए) नंतर येतो 'L' (एल) म्हणजे लव्ह (Love) (प्रेम). प्रेम हे आपल्या संस्कृतीचे पवित्र मूल्य मानले जाते. संवादातील शब्दांना प्रेमाचा ओलावा लागला की, जीवनालाच सुरेल सूर प्राप्त होतात.

'प्रेम कुणावर खरं करावं याचं उत्तर कुसुमाग्रज देतात.

'प्रेम कुणावरही करावं,<br>
गायीच्या नेत्रातील अथांग कारुण्यावर करावं,<br>
मोराच्या पिसाऱ्यातील अद्भूत लावण्यांवर करावं,<br>
प्रेम काळजाच्या नात्यावर करावं,<br>
आणि खडगाच्या पात्यावरही करावं.'

पुरेसं प्रेम यापुढे येते आणि प्रेम लाभलं की माणसाचं जीवन सुंदर होतं.

यापुढे येतो 'T' (टि) म्हणजे टेन्शन फ्री लाईफ; तणावमुक्त जीवन. तणावमुक्त जीवनासाठी अगोदर मनाची छान गुंतवणूक करावी लागत असते. एखाद्या कामात मन गुंतवावे लागत असते आणि काम करून कंटाळा आणि काम करता आलेला कंटाळा हे कंटाळ्याचे दोन प्रकार असतात. श्रमानंतर विश्रांतीचा आनंद काही वेगळाच असतो. त्यासाठी वेगवेगळी कामे करून गुंतवून घेतले पाहिजे. आज ताणतणाव वाढलेले दिसून येतात. तणावमुक्त जीवनासाठी निसर्गामध्ये संचार केला पाहिजे. आवडत्या छंदात वेगवेगळ्या गोष्टींमध्ये मन रमविले पाहिजे.

'एच' पासून 'एल' पर्यंतची पंचसूत्रे जपली की पुन्हा 'एच' येतो. एच म्हणजे 'हॅपी माईन्ड' म्हणजेच आनंदी मन. माणसाचे मन कुस्तीचे मैदान आहे असे म्हणतात. या मैदानावर विचारी- अविचारी, विवेकी-अविवेकी, शांत-चंचल वृत्तीच्या पैलवानांची सदैव कुस्ती सुरु असते. आपण कोणत्या पैलवानांना खुराक देतो त्यावरून त्या कुस्तीचा विजय ठरत असतो. उत्तम मन आणि आरोग्य यांची मैत्री ही अतूट असते. हीच मैत्री जपण्यासाठी 'Health' शब्दातील प्रत्येक अक्षरांचा मंत्र जपूया आणि जगणे सुंदर करूया.

सुंदर जीवन हे जगत असताना त्यातील महत्त्वाची गोष्ट ही विसरायची. ती म्हणजे तुमच्याशी जो कुणी वाईट वागला असेल त्याला विसरून जायचं. अजिबात त्याचं नांव डोक्यामध्ये आणायचं नाही. सत्य, शील, प्रामाणिकपणाची कास धरून वाटचाल केली तर जीवनात चांगले दिवस येत राहतात. प्रत्येक दिवस हा आपल्या जीवनात चांगला येत असतो. त्यावेळी अशा व्यक्तींना प्रथम विसरायचे की ज्यांनी तुमचा द्वेष केला, राग केला त्याचे स्मरण अजिबात करायचे नाही. त्यांच्याशी सूडबुद्धीने वागायचे नाही.

दुसरी गोष्ट विसरायची ती म्हणजे आपण उपकार केले असतील तर त्याला विसरायचे. त्याचे नाव अजिबात काढायचे नाही. त्याला विसरायचे. उपकाराचे वारंवार स्मरण करून देऊन आपला अहंकार वाढवायचा नाही. म्हणजे वाईट वागला त्यालाही विसरायचे आणि आपण ज्याच्याशी चांगले वागलो त्यालाही विसरायचे. या गोष्टी आपण आपल्या जीवनात आचरणात आणल्या तर निश्चितच जीवनात आनंद मिळेल. म्हणून सुंदर जगण्यासाठी या गोष्टी आचरणात आणांव !

**Health :**

या शब्दातील प्रत्येक अक्षरामागील भावार्थ जाणून घेतला, तर व्यक्तिमत्त्वाला सुबक आकार नि जीवनाला स्वास्थ्य प्राप्त होऊ शकते. सुंदर जगण्यासाठी हा शब्द आपण आपल्या आयुष्याच्या पाटीवर गिरवला तर खूपच छान होईल. कारण या शब्दामध्ये आपल्याला 'Health' शब्दापासून वेगवेगळ्या शब्दांचे वर्गीकरण समजले आणि हा शब्द आपल्या जीवनासाठी खूपच छान राहणारा आहे.

❑ ❑ ❑ ❑

वैचारिक

# स्त्रीभ्रुणहत्या

कु.ज्योती चंद्रकांत कोळेकर, बी.ए.भाग-१

आजच्या युगातील स्त्री ही विचारी आहे. ती काळानुसार बदलू पाहत आहे. गेल्या शतकातील स्त्री आणि आजची स्त्री यात महदंतर आहे. आजच्या स्त्रीचा मार्ग जातो आहे विकासाकडे, प्रगतीकडे आणि वैभवाकडे. 'आ' म्हणजे आत्मा 'ई' म्हणजे ईश्वर या दोन शब्दांचा संगम होऊन 'आई' हा शब्द तयार होतो.

आज आपल्या जगातील मुलींची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे प्रत्येकाला हवा असणारा वंशाचा दिवा.

प्रत्येकाला असे वाटते की आपल्या घरात मुलगी जन्माला येऊ नये. कारण मुलगी म्हणजे हुंड्याची कटकट, मुलगी म्हणजे परक्याचं धन, मुलींवर होणारा खर्च हा वाया जातो म्हणून वंशाला दिवा हवा मुलगी नकोच.....

वंशाचा दिवा वंशाचा दिवा<br>
किती उजेड पडलांय बघा

जेव्हा हाच वंशाचा दिवा तुम्हाला लाथ मारून घराबाहेर काढेल तेव्हाच तुम्हाला कळेल मुलीची खरी किंमत. मुलगी का नको? तर तिचे रंरक्षण करावे लागते म्हणून. आपल्या रामाजाची एक रीतच झाली आहे की, स्त्री शील म्हणजे काचेचं भांडं, तडकलं की फुटलं भांडं. लहानपणी बापानं, मोठेपणी नवऱ्यानं आणि म्हातारपणी मुलानं बाईचं रक्षण करायचं असतं. नको त्या रंरक्षणाची कटकट आणि नको त्या हुंड्याची कटकट आणि या सर्वापासून सुटका करून घेण्यासाठी नको ती मुलगी.

अहो आजच्या या जगात मुलींची संख्या एवढी कमी झाली आहे की, आज एक मुलगी आणि दोन मुले अशी गणना करण्याची वेळ आली आहे, वंशाला दिवा हवा म्हणून सोनोग्राफी करून मुलगा आहे की मुलगी हे तपासून पाहतात.

अशीच जर मुलींची संख्या कमी होत चालली तर एके दिवशी हे जगच नष्ट होऊन जाईल. आपला जन्मही एका स्त्रीच्या पोटातून झाला आहे आणि हेही तितकेच सत्य आहे. एक स्त्री ही अनंत काळाची जननी असते. याचे उदाहरण द्यायचे झाले तर सिंधुताई सपकाळ. यांनी तर अनेक अनाथ मुलांना आपलंसं करून त्यांना त्यांच्या पायावर उभं केलं आणि त्यांना प्रगतीपथावर पोहचवलं. जर एक स्त्री अनेक मुलांना प्रगतीपथावर पोहचवू शकते तर अनेक स्त्रिया मिळून या जगाची किती प्रगती करू शकतील आणि म्हणून मुलीऐवजी मुलगा हवांय त्यांनी हेही लक्षात ठेवलं पाहिजे की जर स्त्री जन्मालाच आली नाही तर आपण काही आभाळातून पडणार नाही आणि हे जग टिकून राहण्यासाठी स्त्रीभ्रूण हत्या रोखली पाहिजे.

म्हणतात नां, प्रत्येक यशस्वी पुरूषाच्या मागे स्त्रीचाच हात असतो. याचीही अनेक उदाहरणे आहेत.

महात्मा जोतिराव फुले मुलींना शिक्षण देऊ शकले कारण सावित्रीबाई फुले त्यांच्या पाठीशी होत्या. साने गुरूजींच्या पाठीशी त्यांच्या आई होत्या आणि यापुढेही जाऊन सांगायचे तर कर्तृत्ववान कार्य करण्यात मुलींची संख्या उच्चतम पातळीवर आहे.



किरण बेदी, इंदिरा गांधी, सावित्रीबाई फुले, सिंधुताई सपकाळ, अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई याही

(उर्वरीत मजकूर पृष्ठ क्र.४२ वर....)





व्यक्तिविशेष

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक (टिळकयुग : १८८५ ते १९२०)

कु.प्रणाली गायकवाड, बी.ए.भाग-३

भारतीय असंतोषाचे जनक म्हणून लोकमान्य टिळकांना ओळखले जाते. भारतीय स्वातंत्र्यासाठी आपले जीवन त्यांनी खर्च केले. स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार, स्वातंत्र्य या चतु:सूत्रींचा स्वीकार व प्रसार केला. त्यांनी भारतीय जनतेला स्वराज्याचा कानमंत्र दिला. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारंच' अशी सिंहगर्जना त्यांनी केली.

पार्वतीबाई या चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण माता पित्याच्या पोटी झाला. मूळ नांव केशव, टोपण नांव बाळ होते. वडिल गंगाधर रामचंद्र टिळक हे त्यावेळचे प्रसिद्ध शिक्षक व संस्कृतचे गाढे तज्ञ होते. ते पुण्यात आले. त्यामुळे लहान बाळचे शिक्षण पुण्यातील ॲंग्लो व्हर्न्याकुलर शाळेत सुरु झाले. सन १८७६ मध्ये पुण्यातील प्रसिद्ध डेक्कन कॉलेज मधून बी.ए. ची पदवी संपादन केली. सन १८७९ मध्ये एल.एल.बी. ची डिग्री संपादन केली. प्राध्यापक व वकीलीचा व्यवसाय काही दिवस केला. या काळात त्यांनी वाचन केले. हेगेल, कान्त, स्पेंसर, मिल, रूसो, बेंथम, व्हॉल्टेअर, डिडेरॉ, कॅने इ. युरोपियन तज्ञ लोकांचे ग्रंथ वाचून काढले. भारतीय संत साहित्य वाचले. प्रा.वर्ड्सवर्थ, प्रा.शुट, प्रा.केरू आण्णा छत्रे या डेक्कन कॉलेज मधील प्राध्यापकांचा प्रभाव टिळकांवर पडला होता. इतिहास, इंग्रजी, राज्यशास्त्र या विषयांचा प्रभावही टिळकांवर होता.

**लोकमान्य टिळक यांचे कार्य :**

**१) न्यू इंग्लिश स्कूल व डेक्कन एज्यूकेशन सोसायटीची स्थापना :**

भारतीय जनतेचे परिवर्तन व शिक्षणाशिवाय अशक्य आहे यांची जाणिव झाल्यानेच लोकमान्य टिळक, आगरकर, विष्णूशास्त्री चिपळूणकर, नामजोशी, करंदीकर यांनी १ जानेवारी, १८८० ला न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. पुढील काळात लो. टिळक, सर विल्यम वेडरबर्न, महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, एम.एम.कुंटे, के.पी.गाडगीळ यांनी एकत्र येऊन डेक्कन एज्यूकेशन सोसायटीची स्थापना सन १८८३-८४ मध्ये केली. जेम्स् फर्ग्युसन यांनी या संस्थेला पहिली देणगी दिली रु. १२५०. त्यामुळेच या संस्थेच्या पहिल्या महाविद्यालयास फर्ग्युसन कॉलेज असे नांव दिले. १८८५, या संस्था त्यांनी उत्तम प्रकारे चालविल्या. सन १८९० पर्यंत शैक्षणिक कार्य केल्यानंतर टिळकांनी स्वत:स देशकार्यास वाहून घेतले. कारण -



- सरकारने अन्यायकारक धोरण, आर्थिक साम्राज्यवाद भारतावर लादला. पगार, कर, व्यापार या माध्यमातून प्रचंड संपत्ती इंग्लंडला पाठविली.
- नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतकरी जनतेकडूनही कर सक्तीने गोळा केले. भारतीय शेतकरी या काळात उपाशी पोटी राहिला.
- नैसर्गिक संकट संदर्भात सरकारने जुलमी धोरण स्वीकारले. सन १८९६,९७ ते १९०० या काळात दुष्काळ पडून २ कोटी लोकांना तडाखा बसला. दुष्काळ, साथीचे रोग याबाबतही सरकारने काहीच केले नाही.
- सन १८८५ ते १९०५ या काळात इंग्रज सरकारने अनेक जुलमी कायदे केले. लॉर्ड् लेन्स् डाऊन, लॉर्ड् एलिगन, लॉर्ड् कर्झन यांनी अन्यायी व जुलमी कायदे केले. सरकारी नोकरीवर बंधने आणली. लष्करी व प्रशासकीय खर्चात वाढ केली. सरकारी पैसा उधळला. तर १९०५ मध्ये बंगालची फाळणी करून हिंदू मुस्लीम यांच्यात दुहिचे बीज पेरले.
- परदेशात असणारे भरतीय यांना अपमानास्पद वागणूक दिली. दर्जा, वंश, भेद सुरू केला. त्यांना कमी पगारात राबवले. भारतीय लोकांचे उद्योग व्यवसाय बुडविले. यामुळे प्रचंड असंतोष या काळात निर्माण झाला. या प्रखर राष्ट्रीयत्वाचा टिळकांनी उपयोग करून घेतला. मवाळा विरोधात विचार मांडले. प्रथम स्वराज्य व नंतर समाज सुधारणा अशी भूमिका टिळकांनी घेतली.

**२) जहाल कार्यक्रम :**

सन १९०५ च्या बनारस काँग्रेस अधिवेशनात मवाळ व जहाल असे दोन गट पडले. याच अधिवेशनात चतु:सूत्री कार्यक्रमांचा ठराव मांडण्यात आला. तर सन १९०६ च्या कलकत्ता अधिवेशनात चतु:सूत्रीचा ठराव मान्य करण्यात आला.

- **स्वराज्य :** म्हणजे स्वयंशासन असा अर्थ होता. इतर वसाहती प्रमाणेच प्रशासन भारतात असावे.
- **स्वदेशी :** देशी उद्योग वाढवावेत व स्वदेशी माल वापरावा.
- **बहिष्कार :** सरकार मागण्याचा विचार जोपर्यंत करत नाही तोपर्यंत परकीय माल वापरू नये, त्याच्या होळ्या कराव्यात.
- **राष्ट्रीय शिक्षण :** भारतीय संस्कृती, देशी शिक्षण व पाश्चात्य भौतिकविद्या यांचा काळाच्या कसोटीवर उपयोग करावा.

**३) लो. टिळक व सार्वजनिक सभा :**

सरकारने दुष्काळाच्या काळात दुष्कार निवारण संहिता तयार केली होती. त्यांची माहिती इंग्रजी भाषेतून होती. शेतकरी अशिक्षित असल्याने सरकार दुष्कार काळातही सक्तीने कर वसूल करीत होती. फेमिन रिलिफ कोड नुसार दुष्काळ काळात शेतकरी जनतेला कर भरण्याची आवश्यकता नव्हती. तरीही सरकार कर गोळा करीत होते. त्याविरोधात टिळकांनी मोठी जागृती केली. कर भरू नका असा प्रचार देशात केला. लोकांना सरकारच्या फसव्या कायद्याबाबत जागृत केले. फेमिन रिलिफ कोडची माहिती देणारी पत्रके महाराष्ट्रभर वाटली. दुष्काळ, अन्नछत्रे, छावण्या, औषधे याची मदत लोकांना करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक सभेचा वापर केला.

**४) केसरी व मराठी वृत्तपत्रे**

लो. टिळकांनी आगरकर व विष्णूशास्त्री चिपळूणकर यांच्या मदतीने सन १८८१ ला केसरी हे वृत्तपत्र सुरू केले. केसरी हे मराठी भाषेतून व मराठा हे इंग्रजीत निघत असे. राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व भोवताली घडणाऱ्या घटनांचा निरपेक्ष अहवाल केसरीतून दिला जाई. मराठा हे इंग्रजी भाषा जाणणारे लोकांकरिता असे. देश विदेशातील घटना, इंग्रज सरकारचे धोरण, देशप्रेम इ. विषयावर लेखन केले जाई. १८८१ ते १९२० या काळात टिळकांनी ५१३ अग्रलेख लिहिले. सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय, उजाडले पण सूर्य कुठे आहे, टिळक सुटले पुढे काय, प्रिन्सीपॉल, शिशुपाल की पशुपाल, टोणग्यांचे आचळ, हे आमचे गुरु नव्हेत, बादशहा ब्राह्मण झाले हे त्यांचे प्रसिद्ध अग्रलेख आहेत.

**५) टिळक आणि क्रांतिकारी विचार :**

लो. टिळक यांनी केसरी व मराठा वृत्तपत्रातून सरकार विरोधी परखड विचार मांडले. लोकमान्य टिळकांचे विचार तरुणांवर प्रभाव पाडणारे होते. अर्ज, विनंत्या करून आपण आजपर्यंत काय साधले असा प्रश्न त्यांनी मांडला. जहाल व क्रांतिकारी विचार मांडून प्रखर राष्ट्रीयत्व निर्माण केले. त्यातून जहालांचा एक वर्ग निर्माण झाला. त्यांचे नेतृत्व लाल, बाल, पाल यांनी केले. बंगाल, पंजाब व महाराष्ट्रात जहाल क्रांतिकारी चळवळ सुरू झाली. त्याचा पाया लो. टिळकांनी घातला. परिणामी १९०५ ते १९२० या काळात ही चळवळ बहरली.

**६) लो. टिळक आणि धार्मिक उत्सव :**

भारतीय लोक व समाज हा धर्म, उत्सव, सण यांना खास





महत्त्व देतो. यांची जाण टिळकांना होती. लोकांच्या धर्म भावनेस हात घातल्यास त्याचा उपयोग हा राष्ट्रवाद व स्वातंत्र्यांच्या जागृतीकरिता करता येईल या दृष्टिकोनातून सन १८९४ मध्ये गणेश उत्सव व १८९५ मध्ये शिवजयंती उत्सव सुरु केले. सार्वजनिक उत्सव सुरु झाल्याने तरुणांचे संघटन करणे शक्य झाले. त्याचा उपयोग क्रांतिकारी चळवळीसाठी केला. हे मोठे कार्य लो. टिळकांचे आहे. टिळकांनी पुढील काळात होमरूल चळवळ व प्रतियोगी सहकार्यता या चळवळी केल्या. त्यामुळे इंग्रजांनी टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेऊन अटक केली व ब्रह्मदेशात मंडाले या ठिकाणी ६ वर्षे डांबून ठेवले.

**७) लो. टिळक आणि चतु:सूत्री :**

सन १९०५ च्या बनारस काँग्रेस अधिवेशनात मवाळ व जहाल असे दोन गट पडले. याच अधिवेशनात चतु:सूत्री कार्यक्रमांचा ठराव मांडण्यात आला. तर सन १९०६ च्या कलकत्ता अधिवेशनात चतुसूत्रीचा ठराव मान्य करण्यात आला.

- **स्वराज्य :** म्हणजे स्वयंशासन असा अर्थ होता. इतर वसाहती प्रमाणेच प्रशासन भारतात असावे.
- **स्वदेशी :** देशी उद्योग वाढवावेत व स्वदेशी माल वापरावा.
- **बहिष्कार :** सरकार मागण्याचा विचार जोपर्यंत करत नाही तोपर्यंत परकीय माल वापरू नये, त्याच्या होळ्या कराव्यात.
- **राष्ट्रीय शिक्षण :** भारतीय संस्कृती, देशी शिक्षण व पाश्चात्य भौतिकविद्या यांचा काळाच्या कसोटीवर उपयोग करावा.

**अ) स्वदेशी चळवळ :**

मवाळांची कारकीर्द अपयशी झाली होती. राष्ट्रीय सभेवर जहालांचा कब्जा होता. केसरी व मराठा वृत्तपत्रातून टिळकांनी जहाल तत्त्वज्ञानाचा प्रसार केला. चतु:सूत्री कार्यक्रमांचा त्यातून उदय झाला. सन १९०५ च्या बनारस अधिवेशनात मवाळ व जहाल असे दोन गट पडले. याच अधिवेशनात चतु:सूत्रीचा ठराव मान्य करण्यात आला. या चार तत्त्वांवर पुढे भारतीय स्वातंत्र्य चळवळ विकसित झाली. न्यायमूर्ती रानडे, आगरकर, गणेश वासूदेव जोशी या लोकांनी स्वदेशी चळवळीचा मोठा प्रसार केला. एक राजकीय चळवळ म्हणून लो. टिळकांनी याकडे पाहिले. संपूर्ण देशात व महाराष्ट्रामध्ये पुणे, नागपूर, सातारा, अमरावती या ठिकाणी स्वदेशी चळवळी बाबत जागृती लो. टिळकांनी केली.

**स्वदेशी चळवळीचे स्वरूप :**

भारतातील हिंदी लोकांनी आपल्या देशात तयार होणाऱ्या वस्तू वापरणे. खादीचे कपडे हे या चळवळीचे प्रतिक होते. तर चरखा हे चिन्ह होते. खादीचे कपडे वापरणे, परकीय वस्तू व मालावर बहिष्कार टाकणे, परकीय वस्तूविक्री केंद्रावर बहिष्कार टाकणे, त्याला विरोध करणे.

या स्वदेशी चळवळीने देशी उद्योगधंदे यांना मोठी चालना दिली. त्यामुळे हस्त, कला व्यवसाय यांना चालना मिळाली. विविध वस्तू निर्मितीची केंद्रे सुरु झाली. भारतीय स्त्रियांनी पैसा फंड उभा केला व अनेक वस्तूंची निर्मिती केली.

**ब) बहिष्कार :**

परकीय वस्तू व मालावर बहिष्कार टाकणे, परकीय वस्तूविक्री केंद्रांवर बहिष्कार टाकणे, त्याला विरोध करणे हे यांचे खास वैशिष्ट्य होते. परकीय वस्तू व माल रस्त्यावर आणून त्यांची होळी करणे, स्वदेशी चळवळीच्या प्रसारासाठी 'स्वदेशी जागरण मंच' व 'स्वदेशी प्रचार संघ' स्थापन करण्यात आला. विविध वस्तू भांडार गृहे स्थापन करण्यात आली. बाबू गेनू हे या चळवळीतील पहिले हुतात्मा ठरले. निदर्शने, हरताळ, मोर्चे, संप सुरु झाले. परदेशी माल घेऊन जाणारे ट्रक, मालमोटार, गाड्या लोकांनी आडविल्या. स्वदेशी आंदोलन जोरात सुरु केले. या चळवळीने स्वातंत्र्य चळवळीस गती आणली.

**क) राष्ट्रीय शिक्षण :**

इंग्रजांनी भारतात आधुनिक शिक्षणाची सुरुवात केली हे जरी खरे असले तरी ते शिक्षण भारतीयांना कारकून बनवणारे होते. म्हणून लो. टिळकांनी भारतीय जनतेचे परिवर्तन हे शिक्षणाशिवाय अशक्य आहे यांची जाणिव झाल्यानेच लोकमान्य टिळक, आगरकर, विष्णूशास्त्री चिपळूणकर, नामजोशी, करंदीकर यांनी १ जानेवारी, १८८० ला न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. पुढील काळात लो.टिळक, सर विल्यम वेडरबर्न, महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, एम.एम.कुंटे, के.पी.गाडगीळ यांनी एकत्र येऊन

डेक्कन एज्यूकेशनची सोसायटीची स्थापना सन १८८३-८४ मध्ये केली. जेम्स् फर्ग्युसन यांनी या संस्थेला पहिली देणगी दिली रु. १२५०. त्यामुळेच या संस्थेच्या पहिल्या महाविद्यालयास फर्ग्युसन कॉलेज असे नांव दिले. १८८५ या संस्था त्यांनी उत्तम प्रकारे चालविल्या. पुढील काळात ६ मे, १९२१ मध्ये म. गांधी यांच्या प्रेरणेतून लोकमान्यांचे स्मारक म्हणून 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची' स्थापना करण्यात आली. टिळकांच्या या राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रेरणेतून आर्य समाज, ब्राह्मो समाज, रामकृष्ण मिशन यांनी भव्य कार्य राष्ट्रीय शिक्षणाबाबत केले.

**ड) स्वराज्य :**

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' अशी सिंहगर्जना त्यांनी केली. स्वराज्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षणयाचा पुरस्कार केला. ''स्वराज्य म्हणजे स्वतःचे, म्हणजे प्रजेचे राज्य ते राज्य प्रतिनिधीद्वारे चालविले जाणारे राज्य ही कल्पना टिळकांची होती.'' इंग्रजांना इंग्लंडमध्ये जे जे हक्क मिळतात ते ते हक्क आम्हाला व हिंदी जनतेला द्या अशी मागणी त्यांनी इंग्रज सरकारकडे केली होती. त्यादृष्टीकोनातून टिळकांनी मोठ्या चळवळी केल्या व इंग्रज सरकारकडे स्वराज्याची मागणी केली.

**८) साहित्य व संशोधन कार्य :**

लो. टिळक हे संपादक होते. केसरी व मराठा या वृत्तपत्रांचे संपादन कार्य केले. १८८१ ते १९२० या काळात टिळकांनी ५१३ अग्रलेख लिहिले. इतिहास, संस्कृत, अर्थशास्त्र, गणित, खगोलशास्त्र या विषयावर विपूल लेखन केले. दि ओरायन व आर्क्टिक होम इन द वेदाज् आणि गितारहस्य हे संशोधनपर ग्रंथ प्रसिद्ध आहेत. जेथे शकावली टिळकांनी शोधली व शिवजन्मतिथीचा वाद मिटवला. टिळकांचा पिंड हा अभ्यासू विद्वानाचा होता. राजकारणाच्या धकाधकीत राहून त्यांनी लेखन व संशोधन कार्य केले. अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिले. १ ऑगस्ट १९२० रोजी दुपारी लोकमान्य टिळकांचे निधन झाले.

❑ ❑ ❑ ❑

(......पृष्ठ क्र.३८ वरुन)

स्त्रियाच होत्या; तसेच आजच जगात जागतं उदाहरण द्यायचं झालं तर आपल्या या देशाच्या सर्वात उच्चतम पदावर म्हणजेच राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील. या फक्त घरचाच कारभार सांभाळू शकत नाही तर पूर्ण देशाचाही कारभार सांभाळू शकतात आणि त्याही व्यवस्थितरित्या. या सर्वांची उदाहरणे एवढ्याच साठी की यासारख्या असंख्य स्त्रिया पुन्हा जन्माला येण्यासाठी सर्वात आधी स्त्री भृण हत्या रोखली पाहिजे.

आजच्या युगातील स्त्री ही विचारी आहे. ती काळानुसार बदलू पाहत आहे. गेल्या शतकातील स्त्री आणि आजची स्त्री यात महदंतर आहे. आजच्या स्त्रीचा मार्ग जातो आहे विकासाकडे, प्रगतीकडे आणि वैभवाकडे.

'आ' म्हणजे आत्मा 'ई' म्हणजे ईश्वर या दोन शब्दांचा संगम होऊन 'आई' हा शब्द तयार होतो.

❑ ❑ ❑ ❑





# ख्रिश्चन मिशनरी कार्य

कु.प्रियांका रविंद्र भोसले, बी.ए.भाग-२

धर्मप्रसार कार्यास विरोध केला. कारण येथील लोक सनातनी व जुन्या विचाराचे होते. आपल्या धर्मात ढवळाढवळ झाल्यास ते बंड करतील अशी भिती कंपनी सरकारला वाटत होती. म्हणूनच रॉबर्ट टेलर, अॅबे कॅरे यासारख्या मिशनरी लोकांना हाकलून दिले व कलकत्ता, मुंबई, मद्रास इलाख्यात मिशनरी लोकांनी धर्मप्रसार काम करू नये असे आदेश काढले.

**विल्बर फोर्सचे कार्य :**

विल्बर फोर्स या ख्रिश्चन मिशनरी पार्लमेंट सदस्याने इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये याबाबत मोठा आवाज उठविला व कंपनीच्या वर्चस्वाखालील प्रदेशात मिशनरी लोकांना धर्मप्रसार कार्य करण्याची परवानगी द्यावी असे निवेदन पार्लमेंट सरकारला केले व मिशनरी लोकांना सोई आणि सवलती द्याव्यात असा आग्रह धरला आणि तसे प्रयत्न केले.

**सन १८१३ चा कायदा :**

इंग्लंडच्या सरकारने सन १८१३ चा भारत वसाहत विषयक सनदी कायदा पास केला. या कायद्यात काही प्रमाणात सवलती ख्रिश्चन मिशनरी लोकांना जाहीर केल्या. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर हे मिशनरी भारतात दाखल झाले.

**सन १८३३ चा कायदा :**

या कायद्याने मिशनरी लोकांना भारतात धर्मप्रसार करण्याची परवानगी देण्यात आली. त्यामुळे भारतात मद्रास, कलकत्ता, गोवा, भारताचा पूर्व विभाग, काही उत्तर राज्ये, दक्षिणेकडे केरळ या प्रदेशात मिशनरी धर्मप्रसार कार्य करू लागले. प्रथम त्यांनी मागास व अशिक्षित प्रदेश निवडला. साम, दाम, भेद निती अनितीचा वापर करून धर्मप्रसार केला, पण हे करीत असताना त्यांच्या हातून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व साहित्यविषयक क्षेत्रात मोठी कामगिरी झाली. धर्मप्रसार हेतू मनात ठेऊन का होईना त्यांच्याकडून समाजसुधारणेचे कार्य झाले.

**सामाजिक कार्य :**

सन १८३३ च्या कायद्याने ख्रिस्ती मिशनरी संस्था भारतात दाखल झाल्या. त्यामध्ये जनरल मिशनरी सोसायटी, लंडन मिशनरी सोसायटी, चर्च मिशनरी संस्था, कॅथलिक मिशन, स्कॉटिश मिशनरी सोसायटी, अमेरिकन बॅप्टस्ट मिशन व अमेरिकन मराठी मिशन, चारिटीज् ऑफ मिशनरी या संस्था होत्या.

सन १८१५ ते १८५८ हा कालखंड मिशनरी कर्तबगारी काळ म्हणून ओळखतात. ख्रिस्ती धर्माकडे हिंदी लोकांना आकर्षित करून घेण्यासाठी मोठे सामाजिक काम केले.

समाजवादामुळे युरोपीयन लोकांनी धर्मप्रसार कार्यास सुरूवात केली. युरोपीयन लोक ज्या ठिकाणी गेले. त्या प्रदेशात आपल्या धर्माचा प्रसार केला. भारत देशही याला अपवाद नव्हता. ख्रिशन धर्माचा प्रसार करणाऱ्या ज्या संस्था आहेत त्यांना मिशन असे म्हणतात व धर्मप्रसार करणारे जे लोक असतात त्यांना मिशनरी म्हणतात. विविध अडचणींवर मात करून धर्मप्रसार करणे एकमेव ध्येय या लोकांचे होते. धर्मप्रसार कार्याच्या नावाखाली यांनी भारताच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व साहित्यविषयक क्षेत्रात मोठी कामगिरी केली.

**कंपनीचे धोरण :**

मिशनरी कंपनीच्या अधिपत्याखालील प्रदेशात राहून गुपचूपपणे धर्मप्रसार कार्य करीत. हे लक्षात येताच कंपनी सरकारने त्यांना

**सुविचार**

तणावमुक्त जीवनासाठी अगोदर मनाची छान गुंतवणूक करावी लागत असते. एखाद्या कामात मन गुंतवावे लागत असते आणि काम करून कंटाळा आणि काम करता आलेला कंटाळा हे कंटाळ्याचे दोन प्रकार असतात. श्रमानंतर विश्रांतीतला आनंद काही वेगळाच असतो. त्यासाठी वेगवेगळी कामे करून गुंतवून घेतले पाहिजे.

१. हिंदी समाजाला त्यांच्यातील वाईट प्रथा, परंपरा, रूढी यांची जाणीव करून दिली.
२. गरीब लोकांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला.
३. अन्न, वस्त्र व निवारा या गरजा उपलब्ध करून दिल्या.
४. अनेक गावात पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले.
५. ख्रिश्चन धर्म तत्त्वे कळावीत म्हणून सभा, मेळावे, चित्रे, कथा यांचे नियोजन केले.
६. प्रभू येसूचे चमत्कार लोकांच्या मनावर बिंबवले.
७. दुष्काळ काळात लोकांना सर्व मदत केली.
८. मोफत दवाखाने सुरु करून रोगी लोकांची मोठी सेवा केली. हे सर्व कार्य सामाजिक कार्य करण्यापाठीमागे येथील ख्रिस्ती धर्माकडे आकर्षित व्हावेत हा हेतू होता. या कामात त्यांना यश आले.

**शैक्षणिक कार्य :**

ख्रिश्चन धर्म तत्त्वज्ञान व धर्म ग्रंथ हे इंग्रजी भाषेत होते. लोकांना ते कळावे यासाठी इंग्रजी भाषेचे ज्ञान देणारी केंद्रे स्थापन केली. खेड्यातून शाळा, माध्यमिक शाळा सुरू केल्या. (नॉर्मल स्कूल, मॉंटेसरी स्कूल) मुंबई, मद्रास, कलकत्ता, त्रिचनापल्ली, तंजावर, सहारनपूर, गोवा, सुरत, चौल, अहमदनगर, पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, कोकण किनारपट्टी इ. ठिकाणी त्या शाळा चालू केल्या. डॉ. विल्सन याने मुस्लिम मुलांसाठी शाळा सुरू केल्या. गॉर्डन हॉल याने अनेक ठिकाणी शिक्षणविषयक काम केले. ह्युम मॅडमनी भारतातील मुलींच्या शिक्षणासाठी मोठे प्रयत्न केले. १८२४ ला त्यांनी मुलींची शाळा सुरू केली. पण चालली नाही. पोर्तुगिज मिशनरी लोकांनी कोचीन या ठिकाणी विद्यापीठ सुरु केले. मिशनरी लोकांनी वसतीगृहे सुरू केली. मुंबईत सेंट्रल व विल्सन कॉलेज सुरू केले. तर गोव्यात जेसूईट महाविद्यालय चालू केले. बंगालच्या प्रदेशात हिंदू कॉलेज, कलकत्ता स्कूल, मद्रास स्कूल चालू केली. बेलेंटाईन, ज्युलिया विसेंस, फेअर बँक या मिशनरी लोकांनी शिक्षणविषयक क्षेत्रात मोठे कार्य केले. पोर्तुगीत, डच, फ्रेंच, इंग्रज मिशनरी लोकांनी आपल्या वसाहती परिसरात शाळा, कॉलेज स्थापन केली व पाश्चिमात्य विद्या व भौतिकविद्या, तंत्रशिक्षण सुरु केले. यांचा लाभ अशिक्षित भारतीय समाजाला झाला.

**धर्मप्रसार कार्य :**

ख्रिस्ती मिशनरी लोकांनी समाजसेवी भावनेतून धर्म प्रसार कार्य केले. अप्रगत, मागास, अज्ञानी समाजाला समाजसेवा नावाखाली आर्थिक मदत करून ख्रिश्चन धर्माकडे आकर्षित करून घेतले.

तसेच शिकलेल्या भारतीय समाजाला धर्मग्रंथ बायबल, ख्रिस्ती धर्मतत्त्वे, समभाव, नैतिक तत्त्वे, भाषा, शिक्षण, तंत्रज्ञान, दवाखाने, नोकरी देणे. इ. माध्यमातून सज्ञान भारतीय समाजाचे मत परिवर्तन केले व धर्मकार्य केले. ख्रिस्ती होणाऱ्या लोकांना शासनाच्या माध्यमातून अनेक सोई सवलती दिल्या. परिणामी भारतातील अनेक लोकांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. हिंदू धर्मातील परंपरांना कंटाळलेल्या अनेक वंचीत जाती जमातींनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. साम, दाम, दंड निती चा वापर करून अत्यंत कौशल्याने धर्मप्रसार काम केले. भारतात पुढील काळात ख्रिस्ती संत उदयास आले. विष्णू करमरकर, रामकृष्ण मोडक, नारायण व श्रीपाद शेषाद्री बंधू, बाबा पद्मजी, पंडिता रमाबाई या भारतीय ख्रिस्ती संतांनी मोठा धर्मप्रसार केला. जनरल मिशनरी सोसायटी, लंडन मिशनरी सोसायटी, चर्च मिशनरी संस्था, कॅथलिक मिशन, स्कॉटिश मिशनरी सोसायटी, अमेरिकन बॅप्टस्ट मिशन व अमेरिकन मराठी मिशन, चारिटीज् ऑफ मिशनरी या संस्थाही या काळात धर्मप्रसार कार्य करीत होत्या. पोर्तूगिजांनी सक्तीने धर्मप्रसार कार्य आपल्या इलाख्यात केले.

